गोरेगाव येथील मोतीलाल नगर वसाहतीचा पुनर्विकास 'कन्स्ट्रक्शन आणि डेव्हलपमेंट एजन्सी'मार्फत करण्यास मान्यता मिळाली होती. या प्रकरणी म्हाडाने निविदा जारी केली होती. अदानी आणि एल अँड टी या दोन बड्या विकासकांच्या निविदा अंतिम शर्यतीत आहेत. परंतु न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्यामुळे पुनर्विकास पुढे सरकू शकलेला नाही. अभ्युदय नगर वसाहतीच्या पुनर्विकासाला शासनाने मंजुरी दिली आहे. अभ्युदय नगर वसाहतीत फक्त एकाच इमारतीच्या पुनर्विकासाला मान्यता दिली होती. परंतु या इमारतीचे काम अद्याप सुरू झालेले नाही. या इमारतीतील रहिवाशांना ५१० चौरस फुटाचे घर देऊ करण्यात आले आहे.

विकास नियंत्रण नियमावलीतील ३३(५) अन्वये या वसाहतीचा पुनर्विकास होणार आहे. हा परिसर चार हजार चौरस मीटरपेक्षा अधिक असल्यामुळे चार इतके चटईक्षेत्रफळ लागू होणार आहे. यापैकी एक चटईक्षेत्रफळाइतका घरांचा साठा निवड झालेल्या विकासकाला द्यावा लागणार आहे. कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलमेंट एजन्सी या पद्धतीनुसार निविदा मागवून सर्वाधिक घरांचा साठा किंवा अधिमूल्य देणाऱ्या विकासकाची निवड केली जाणार आहे. या विकासकाने रहिवाशांना पर्यायी भाडे आणि कॉर्पस निधी द्यावयाचा आहे. हा प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावा आणि यावर संनियंत्रण राहावे यासाठी गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत म्हाडाचे उपाध्यक्ष, महापालिकेचे संबंधित अतिरिक्त आयुक्त, उपसचिव, मुंबई गृहनिर्माण मंडळाचे मुख्य अधिकारी यांचा समावेश असून या समितीने शिफारशी सादर करावयाच्या आहेत. याशिवाय चार महिन्यांतून एकदा या प्रकल्पाचा आढावाही या समितीने घ्यावयाचा आहे.३३ एकरवरील पसरलेल्या या भूखंडावर ४९ इमारती असून ३३५० रहिवाशी राहतात. या पुनर्विकासातून दहा हजारहून अधिक घरे म्हाडाला सोडतीसाठी अपेक्षित आहेत.

**विकासकाने अधिक आकाराचे घर दिल्यास म्हाडाचा आक्षेप नाही**

*खुल्या निविदेद्वारे या वसाहतीच्या पुनर्विकासासाठी विकासकाची निवड केली जाणार आहे. याबाबत म्हाडाला देवधर असोसिएटने सादरीकरण केले आहे. या सादरीकरणात म्हाडाने प्रकल्प व्यवहार्यतेच्या पार्श्वभूमीवर ४९९ चौरस फुटाचे (रेरा कार्पेटप्रमाणे ५४८ चौरस फूट) घर देण्याची तयारी दर्शविली आहे. याशिवाय प्रत्येक रहिवाशाला पाच लाख रुपये कॉर्पस निधी आणि रहिवाशांचे २० हजार रुपये तर व्यावसायिक सदनिकांना ३० हजार रुपये भाडे देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. यापेक्षा अधिक आकाराचे घर म्हाडा देऊ शकत नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. निविदेद्वारे निवड होणाऱ्या विकासकाने यापेक्षा अधिक घर दिले तर आमची हरकत नाही, अशी भूमिका म्हाडाचे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जैस्वाल यांनी मांडली आहे.*

'प्रजा'चे रिपोर्ट कार्ड जाहीर

# विधानसभेतील कामकाजात मुंबादेवीचे काँग्रेस आमदार अमीन पटेल अव्वल

## शिवसेनेचे (उध्दव ठाकरे) सुनील प्रभू दुसरे तर काँग्रेसच्या वर्षा गायकवाड तिसऱ्या

**प्रतिनिधी**

■ **मुंबई**

प्रजा फाऊंडेशनचा 'मुंबईतील आमदारांचे प्रगती पुस्तक, 2024' हा अहवाल काल 20 ऑगस्ट 2024 रोजी.एका पत्रकार परिषदेत प्रकाशित करण्यात आला. त्यामध्ये अर्थसंकल्पीय सत्र 2023 ते अर्थसंकल्पीय सत्र 2024 या वर्षभराच्या कालावधीतील आमदारांच्या कामगिरीचे मूल्यमापन केले आहे. प्रजाने यावेळी मूल्यमापन प्रक्रिया अधिक व्यापक केली असून त्यामध्ये किमान तीन वर्षे सदस्य असलेल्या आमदारांच्या एकत्रित कामगिरीचे मूल्यांकन केले आहे आणि 14 व्या विधानसभा सत्राची उत्पादनक्षमता, विशेषतः कामकाज दिवसांची संख्याही, तपासली आहे. या मूल्यांकनानुसार प्रथम तीन श्रेणीच्या आमदारांमध्ये आमदार अमिन पटेल (श्रेणी 1-82.92%), आमदार सुनील प्रभू श्रेणी (2-78.71%) आणि आमदार वर्षा गायकवाड (श्रेणी 3-76.51%). सर्वोच्च श्रेणी पटकावणाऱ्या या तीन आमदारांनी आपल्या संविधानिक जबाबदाऱ्याचे भान राखत सभागृहातील कामगिरी बजावली आहे.असे प्रजा ने म्हटले आहे. विशेष म्हणजे या तीन मध्ये सत्ताधारी महायुतीचा एकही आमदार नसल्याचे दिसून आले आहे.

प्रजा च्या या अहवालामध्ये मात्र पहिल्या १० आमदारांमध्ये मात्र भाजपचे ५, काँग्रेस चे ३ आणि



शिवसेना उध्दव ठाकरे व शिंदे गटाचे प्रत्येकी एका आमदाराने स्थान मिळविले आहे.यात अनुक्रमे अमीन पटेल,सुनील प्रभू, वर्षा गायकवाड, मनीषा चौधरी, अस्लम शेख,अमित साटम, अँड. आशिष शेलार, यामिनी जाधव,अतुल भाखळकर,आणि पराग अळवणी यांचा समावेश आहे.

या सत्रांमध्ये या पहिल्या तीन आमदारांनी नागरिकांच्या समस्यांवर आधारित प्रश्न विधानसभेत विचारले आहेत आणि सर्वाधिक उपस्थिती टिकवून ठेवली आहे. आमदारांच्या कामगिरीवरून त्यांच्या संबंधित राजकीय पक्षांच्या कामगिरीचा विचार केला तर भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने सर्वाधिक 72.56% मिळवत प्रथम स्थान पटकावले आहे. 60.08% मिळवणारा भारतीय जनता पक्ष दुसऱ्या क्रमांकावर आहे, मात्र दोघांच्या गुणात बराच फरक आहे.

विधानसभा सत्रांमध्ये विचारलेल्या प्रश्नांची संख्या 12व्या सत्रात 40,512 होती, जी घटून 14व्या विधानसभेत 11,132 झाली, ही घट 73% आहे. 'विचारलेल्या प्रश्नांची संख्या' या मापदंडाचे सरासरी गुण प्रगती पुस्तकानुसार वर्ष 2022 ते 2024 दरम्यान तितकेच म्हणजे 13.9% राहिले आहेत. तर'प्रश्नांच्या गुणवत्ते'च्या संख्येसाठी सरासरी गुण प्रगती पुस्तकानुसार वर्ष 2022 ते 2024 दरम्यान तितकेच म्हणजे 12% राहिले आहेत. 2024 मध्ये 34 आमदारांपैकी केवळ एका आमदाराने 80% च्या वर गुण मिळवले आहेत.

14 व्या विधानसभा सत्रातील आमदारांच्या एकत्रित कामगिरीचे चित्र मात्र चिंताजनक आहे. असे प्रजणे म्हटले आहे. 13 व्या विधानसभा सत्राच्या तुलनेत चालू सत्रातील कामगिरी कमालीची खालावलेली आहे. हे वास्तव मागच्या काही वर्षात आपल्या राज्याने ज्या समस्यांचा सामना केल्या त्यांचा विचार करता अस्वस्थकारक आहे. सर्वात कमी गुण मिळालेल्या आमदारांची कामगिरी प्रकर्षाने खालावलेली आहे. 13 व्या विधानसभेत निम्नतम गुण मिळवणाऱ्या पाच आमदारांच्या गुणांची सरासरी 48.13% होती, तर 14 व्या विधानसभेत ही सरासरी घटून 34.81% आहे. यावरून कामगिरीचा दर्जा घसरलेला आहे हे स्पष्ट होते, म्हणजेच हे लोकप्रतिनिधी आपल्या संविधानिक जबाबदाऱ्या पार पाडण्यात कमी पडत आहेत आणि हे वास्तव काळजी करण्यासारखे आहे," असे मत प्रजा फाऊंडेशनचे सीईओ मिलिंद म्हस्के यांनी मांडले.

# अजित पवारांना महायुतीतून बाहेर काढण्याचे शिंदे शिवसेनेचे प्रयत्न

## संजय राऊतांचा खळबळजनक दावा

**प्रतिनिधी**

■ **मुंबई**

गेल्या काही दिवसांमध्ये महायुतीत वादाच्या अनेक ठिणग्या पडल्याचे पाहायला मिळाले आहे. महायुतीतील तीन प्रमुख नेते एकमेकांसोबत असले तरी कार्यकर्त्यांमधील वाद पेटला आहे. सोमवारी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदार कदम यांचे थोबाड फोडण्याची भाषा केली, ज्यामुळे भाजपा आणि शिंदे गटात वाद निर्माण झाला आहे, तर दुसरीकडे भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी एका कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार यांना काळे झेंडे दाखवले. त्यामुळे आता महायुतीविरोधात बोलण्यासाठी विरोधकांच्या हाताला आयते कोलीत मिळाले आहे. ज्यानंतर या मुद्द्यावरून



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी या मुद्द्यावरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबाबत मोठा दावा केला आहे. शिंदे गटाकडून अजत पवारांना महायुतीच्याबाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा दावा राऊतांनी केला आहे.

मंगळवारी (ता. ) पत्रकार परिषदेत बोलताना खासदार संजय राऊत म्हणाले की, महायुतीतल्या तीन पक्षांमध्ये एकवाक्यता राहिलेली नाही. ती युती नाही, संघर्ष होतो आहे. रोज त्यांच्या मारामाऱ्या सुरू आहेत. त्या दिसत नाहीत. एक मंत्री आपल्या सहकारी पक्षाच्या नेत्याला मारण्याची भाषा करतो म्हणजे प्रकरण टोकाला गेले आहे हे पाहू शकता. कारण मुंबई गोवा महामार्ग हा स्वर्गात जाण्याचा मार्ग बनला आहे. ठेकेदारांकडून महाराष्ट्रात लूट सुरू आहे. पाटबंधारे खातं, रस्ते विकास खातं हे सगळी शिंदे गटाची एटीएम मशीन्स झाली आहेत, त्यामुळे कामे होत नाहीत अशी स्थिती आहे. सरकार पैशांच्या मागे लागले आहे, असा खोचक टोलाही राऊतांनी लगावला आहे.

# सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर आज भीम आर्मीचे दादर येथे आंदोलन

■ **मुंबई**

देशातील अनुसूचित जाती आणि जमातीचे वर्गीकरण आणि क्रिमिलियर ची अट टाकण्याच्या सर्वोच्च नायायालयाच्या निर्णयावर देशभरात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने आज देशभरात भारत बंद पुकारण्यात आला आहे. भीम आर्मी या सामाजिक संघटनेने आज बुधवारी दुपारी २ वाजता मुंबईत आरक्षण बचाव आंदोलनाची घोषणा केली आहे.

सर्वोच्च नायायालयाने मागील महिन्यात अनुसूचित जात आणि जमातींचे वर्गीकरण करण्याचा निर्णय दिला सोबतच या वर्गाला क्रिमीलेअर ची अट टाकण्यात आली असून या निर्णयाविरोधात देशभरातील मागासवर्गीय संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे . सदर निर्णयाच्या अनुषंगाने आ २१ ऑगस्ट रोजी देशभरात भारत बंद पुकारण्यात येत आहे या पार्श्व भूमीवर महाराष्ट्रात ठिकठिकाणी आंदोलने होणार आहेत मुंबईच्या आझाद मैदानावर रिपब्लिकन संघटनांच्या वतीने एकदिवसीय आंदोलन करण्यात येणार आहे.

भीम आर्मीच्या वतीने दादर रेल्वे स्टेशन पूर्व हनुमान मंदिराजवळ दुपारी २ वाजता आरक्षण बचाव आंदोलन करण्यात येणार आहे . या आंदोलनात मुंबईतील सर्व सामाजिक धार्मिक राजकीय पक्षसंघटनांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन या संघटनेचे राष्ट्रीय महासचिव अशोक कांबळे व मुंबई अध्यक्ष अविनाश गरुड यांनी केले आहे .

# केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा अनिल मुरारका यांनी केला गौरव

**प्रतिनिधी**

■ **मुंबई**

एम्पल मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि देशातील प्रख्यात समाजसेवक डॉ. अनिल काशी मुरारका यांनी रामदास आठवले यांचा भारत सरकारचे सामाजिक न्याय राज्यमंत्री तिसऱ्यांदा झाल्याबद्दल त्यांच्या जेट गार्डन कार्यालयात काशी विश्वनाथाची मूर्ती अर्पण करून त्यांचा गौरव केला.

यावेळी वांद्रे पूर्व येथील जेट गार्डन कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधताना डॉ.अनिल काशी मुरारका म्हणाले की, रामदास आठवले यांच्यासारखे नेते देशात



फार कमी आढळतील. जो प्रत्येक कार्यकर्त्याला, मग तो मोठा असो, लहान असो, किंवा देशाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यातील सामान्य माणसाशी आदराने वागतो आणि प्रत्येक माणसाचे काम करतो. त्यांचे वागणे पाहून शिकण्यास व प्रेरणा मिळते. डॉ. मुरारका यांनी त्यांना लोणावळ्यातील त्यांच्या ट्रस्टने बांधलेल्या नारायणी धाम मंदिराला भेट देण्याचे आमंत्रण दिले, जे त्यांनी आनंदाने स्वीकारले. आठवले यांनी लवकरच नारायणी धामला भेट देण्याचे आश्वासन दिले.

**मध्य रेल्वे**

**ब्रेक पॅनलची दुरुस्ती/ ओवरहौलिंग**

वरिष्ठ विभागिय विद्युत अभियंता (ट्रॅक्शन रोलिंग स्टॉक), इलेक्ट्रिक लोको शेड, कल्याण: ४२१३०१ भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने नामांकित कंत्राटदारांकडून खालील कामे/ सेवांसाठी संकेतस्थळ www.ireps.gov.in द्वारे एकल ई-निविदा मागवित आहेत. कामाचे नाव: ओईएमसह एकल निविदा तत्वावर मे. फैवेली प्रायव्हेट लिमिटेड – होसूर बनावटीच्या इलेक्ट्रिक लोकोमोटिव्ह (डब्ल्यूएपी- ७ टाईप) च्या ई-७० ब्रेक पॅनलची दुरुस्ती/ ओवरहौलिंग. कामाचे अंदाजे मूल्य: रु. १,४७,४०,५३५.३० (१८% जीएसटीसह) इरठे / बोली सुरक्षा : रु. २,२३,७००/- निविदा अर्जाचे शुल्क: काही नाही. पूर्तता कालावधी: १८ महिने. सूचना : १) उपरोक्त निविदेच्या निविदा समाप्तीचा दिनांक आणि वेळ: ०९/०९/२०२४ रोजी ११.०० वा. पर्यंत आणि त्याच दिवशी ११.०० वा. उघडण्यात येतील आणि प्रस्तावांची वैधता ६० दिवस असेल. (२) निविदेचा पूर्ण तपशिल www.ireps.gov.in संकेतस्थळावर आणि वरी. डीईई (टीआरएस) कार्यालय, कल्याण ह्यांच्या सूचना फलकावर देखील उपलब्ध असेल.

ई-निविदा सूचना क्र.: ईएलएसकेव्हायएनडब्ल्यूकेएस२३-२१-ई-७०-ब्रेक

340

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

**बोली मागविणारी सूचना (२ री मागणी)**

**सिडकोच्या अ‍ॅन्युअल गॅदरिंगकरीता टी-शर्टसचा पुरवठा (१५०० नग) (२ री मागणी)**

महाराष्ट्राची सिडको लिमिटेड ई-निविदाकरण प्रक्रीयेद्वारे ऑन लाईन नग दर बोली अनिवार्य पात्रता निकषांची पूर्तता करणाऱ्या ज्यांनी खाली नमूद कामासाठी तस्तम स्वरूपाचे काम पूकरण्याचा अनुभव असलेल्या प्रस्तावित बोलीदारांकडून मागवित आहेत:

१. कामाचे नाव : सिडकोच्या अ‍ॅन्युअल गॅदरिंगकरीता टी-शर्टसचा पुरवठा (१५०० नग) (२ री मागणी). २. सी. ए. क्र.: ०२/सिडको/गॅदरींग/२०२४-२५ ३. इ.र.ठे.: रु. १०,०००/- (रु. दहा हजार मात्र) ५. पूर्तता कालावधी: पुरवठा होईपर्यंत वैध. ६. निविदा प्रक्रिया शुल्क: रु. १,१८०/- (१८% जीएसटीसह) (ना-परतावा) (बोली शुल्क रु. १०००/- + रु. १८०/- जीएसटीकरीता)

बोलीकरण कार्यक्रमासह बोली कागदपत्रे https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर २१/०८/२०२४ रोजी १७.०१ वा. पासून उपलब्ध असेल.

**महासचिव**
**अ‍ॅन्युअल सोशल गॅदरींग कमिटी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१९०/२०२४-२५

# अंमळनेरच्या अपघातग्रस्त युवकाला शिवसेना पदाधिकाऱ्यांची मोठी मदत


## युवकांची परवड थांबवण्याचे सरकारला साकडे

**प्रतिनिधी**

■ **मुंबई**

सरकारी नोकरीची दिवा स्वप्न घेऊन फिरणाऱ्या मुलांची परवड कधी संपणार असे लोकांना वाटते आहे.पोलीस भरती असो किंवा बँकांच्या भरत्या मुलांची पुरती दमछाक होताना दिसते.सध्या पोलीस भरतीसाठी घाटकोपर पूर्वेकडील कवायती मैदानात मुलामुलींची भरती सुरु आहे.महाराष्ट्रातल्या विविध भागा मधुन पोलीस होण्याची स्वप्न बाळगून हजारो तरुण तरुणी इथे येताना दिसत आहे.

असेच नोकरीचे स्वप्न उराशी बाळगून येणाऱ्या अंमळनेर येथील तरुण घाटकोपरच्या रेल्वे फलाटावर उतरताना पाय घसरून पडला.या तरुणाला राजावाडी रुग्णालयात उपचारार्थ आणले असता,आता पुढे आपले काय होणार,नोकरीचे प्रयत्न थांबवावे का ? आशा विवंचनेत असताना हा तरुण उद्धव ठाकरे



शिवसेनेचे पदाधिकारी प्रकाश वाणी व सचिन भांगे यांना आढळला.त्यांनी या तरुणांची विचारपूस करत या तरुणाचे एमलएलसी करून घेतले,त्याला योग्य ते उपचार दिले.या सर्व सहकार्यामुळे तरुणाने गहिवरत ठाकरे शिवसेना पदाधिकारी प्रकाश वाणी,सचिन भांगे यांचे आभार मानले. अशाप्रकारच्या दबावात तरुणांना जो नोकर भरतीत त्रास सहन करावा लागतो, त्याच्याकडे सरकारने गांभीर्याने बघायला हवं,असे मत प्रकाश वाणी यांनी व्यक्त केले.

**पश्चिम रेल्वे**

**लिफ्टसची तरतूद**

वरी. डीईई/पी/बीसीटी, पश्चिम रेल्वे, मुंबई सेन्ट्रल, मुंबई ४०० ००८ निविदा सूचना क्र.: ईएल१६६/१३४/डब्ल्यूए/९७/ (आर-I) , दिनांक १६.०८.२०२४ मागवित आहेत. काम आणि ठिकाण: मुंबई विभाग - सुगम्य भारत अभियान (फेज-२) च्या अंतर्गत स्थानकांच्या ठिकाणी २४ नं. लिफ्टसच्या (मूळ ४०) पश्चिम रेल्वेच्या तरतूदीसंदर्भात ०६ नं. लिफ्टसची तरतूद. (विद्युत आणि नागरी कामांसाठी संयुक्त निविदा) कामाचे अंदाजे मूल्य: रु. २,५२,२१,२०९.५९/-. इरठे: रु. २,७६,१००/-. सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: १२.०९.२०२४ रोजी १५.०० वा. पर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: १२.०९.२०२४ रोजी १५.३० वा. टिप: निविदा कागदपत्रे, शुद्धिपत्रक आणि अधिक माहिती डाऊनलोड करण्यासाठी कृपया www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.

0462

आम्हाला लाईक करा facebook.com/WesternRly

**महाराष्ट्र शासन**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
मध्य मुंबई (विद्युत) विभाग, सा. बां. विभाग,
सावली इमारत, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई- ४०००१८.
सत्यमेव जयते

ई-मेल : elcentralmumbai.ee@mahapwd.gov.in, elcentraimumbai.ee@gmail.com. दूरध्वनी क्र. ०२२-२४९२४३४९

**दरपत्रके मागविण्याबाबतची सूचना क्र. 08 सन 2024-25**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग वरळी मुंबई १८ हे खालील कामांसाठी / विविध महिन्यांसाठी अंदाजपत्रके / दर अनुसूची तयार करण्यासाठी साहित्य विक्रेते / डिलर्स / उद्योजक तसेच अनुभवी अभिकरणाकडून स्पर्धात्मक दर मागवित आहे.
सदर दरपत्रके http://www.mahatender gov.in या संकेत स्थळावर दि. २०.०८.२०२४ ते दि. २७.०८.२०१४ रोजी १७.३० वाजेपर्यंत Online पद्धतीने सादर करावे. किंव्हा कार्यालीन वेळेत कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विभाग, वरळी, मुंबई येथे दरपत्रके सादर करावे. सदर दरपत्रके शक्यतो दि. २९.०८.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. सदर बाबींचे तांत्रिक तपशील वरील संकेत स्थळावर व या कार्यालयात उपलब्ध राहतील. अटी व शर्ती असलेले दरपत्रके स्वीकारली जाणार नाही.

Est. No. D23097/2024-25 Providing PA System for drama with Dolby ATMOS Sound System for movie at PLDeshpande Akadami, Prabhadevi, Mumbai
2) H25025 of 2024-25 - Providing ARD Panel & Fully Comprehensive Maintenance & servicing of Lift No. 1 & Lift No.2.6 passangers, G+7 Floors, in Trupti 8A building at Sir J.J.Group of Hospitals, Byculla, Mumbai (1 lift for 1 year & 1 lift for 3 years)2)
3) H25027 of 2024-25 Providing ARD Panel & Fully Comprehensive Maintenance & servicing of Lift No. 14 passangers. G+3 Floors, in Physiology building at Sir J.J.Group of Hospitals, Byculla, Mumbai (1 lift for 3 years)
4) H25028 of 2024-25 Providing ARD Panel & Fully Comprehensive Maintenance & servicing of Lift No. 1 & Lift No. 2.8 passangers, G+5 Floors, in Central Library building at Sir J.J.Group of Hospitais. Byculla. Mumbai (2 lifts for 3 years).
5) H25029 of 2024-25 : Providing ARD Panel & Fully Comprehensive Maintenance & servicing of Lift No. 15 passangers. G+4 Floors,in Ladies hostel building at Sir J.J.Group of Hospitals. Byculla, Mumbai(1 lift for 1 year).5)
6) H25030 of 2024-25 Providing ARD Panel & Fully Comprehensive Maintenance & servicing of Lift No. 1.6 passangers, G+3 Floors, in P.G. building at Sir J.J.Group of Hospitals. Byculla, Mumbai(1 lift for 1 year)"

**Note:- Please visit to www.mahatender.gov.in notice inviting tender page for detail item description.**

**अटी :-**
१ दरपत्रकं सीलबंद पाकीटात व कंपनीच्या नाममुदीत पत्रावर गादर करावीत. वर नमुद केलेल्या दिनांकांनंतरदरपत्रकं स्वीकारण्यात येणार नाहीत.
२ नमुद केलेले दर हे ९० दिवस ग्राह्य राहतील.
३ कोणतेही दरपत्रक कोणतेही कारण न देता नामंजुर करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी गडून ठेवला आहे.
४ वरील दर भरताना जी. एम. टी. दर वगळुन नमुद करावा. अंदाजीत रक्कमंचर नमुद केलेल्या इरानुगार आलेल्या रक्कमेवर १८% नुसार जी. एम. देय राहील.कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास नोटीसची प्रत विनामुल्य मिळू शकेल.

जा.क्र. काअ/ममुविति/२०२६/२०२४
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
मध्य मुंबई (विद्युत) विभाग, सा. बां. विभाग
सावली इमारत, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ४०००१८.
दि. १८/०८/२०२४
डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/सी२१८४

Sd/.
कार्यकारी अभियंता
मध्य मुंबई विद्युत विभाग,
सा. बां. विभाग, मुंबई - १८.

Sd/.
(नलिनी सु. सुत्रावे)
कार्यकारी अभियंता
मध्य मुंबई विद्युत विभाग

**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ**
**म्हाडाचा विभागीय घटक**
म्हाडा MHADA

**ई-निवीदा**

कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, म्हाडाचा विभागीय घटक, गृहनिर्माण भवन, २ रा मजला, कलानगर, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. यांचे मार्फत मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडातील एक घटक यांच्या मार्फत ब-१ नमुन्यात मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळातील कामासाठी टक्केवारी पध्दतीने विना अटीबाबतची निविदा मागविण्यात येत आहे. कंत्राटदारास हे मूळ उत्पादक किंवा त्यांची अधिकृत एजन्सी किंवा विदयुत ठेकेदार यांच्याकडे विदयुत ठेकेदार परवाना आणि या सारख्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. निविदा दस्तऐवजात दिलेले पात्रता निकष.

| निविदा क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकाची रक्कम रु. | इसारा रक्कम १% अंदाजपत्रकीय किंमती पुरवठा | सुरक्षा अनामत रक्कम २% अंदाजपत्रकीय दराच्या | कंत्राटदाराचा वर्ग | निविदेची रक्कम १८% जीएसटी सह | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अन्ना नगर, कांदिवली पूर्व, मुंबई येथे सोलार स्ट्रीट लाईट प्रदान करणे | २१,०७,७२०/- | २१०७७.०० | ४३०००/- सुरवातीला ५०% आणि ५०% देयक मार्फत | मुळ उत्पादक किंवा त्यांचा अधिकृत एजन्सी किंवा विदयुत ठेकेदार यांच्याकडे इलेक्ट्रिकल कॉन्ट्रक्टर परवाना आणि अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असावा. | ५९०/- | ३ महिने मान्सून सह |
| २. | काजूपाडा, पोईसर, कांदिवली-पूर्व, मुंबई येथे सोलार स्ट्रीट लाईट प्रदान करणे | २१,०७,७२०/- | २१०७७.०० | ४३०००/- सुरवातीला ५०% आणि ५०% देयक मार्फत | मुळ उत्पादक किंवा त्यांचा अधिकृत एजन्सी किंवा विदयुत ठेकेदार यांच्याकडे इलेक्ट्रिकल कॉन्ट्रक्टर परवाना आणि अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असावा. | ५९०/- | ३ महिने मान्सून सह |
| 3. | हनुमान नगर, कांदिवली- पूर्व, मुंबई येथे सोलार स्ट्रीट लाईट प्रदान करणे | २१,०७,७२०/- | २१०७७.०० | ४३०००/- सुरवातीला ५०% आणि ५०% देयक मार्फत | मुळ उत्पादक किंवा त्यांचा अधिकृत एजन्सी किंवा विदयुत ठेकेदार यांच्याकडे इलेक्ट्रिकल कॉन्ट्रक्टर परवाना आणि अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असावा. | ५९०/- | ३ महिने मान्सून सह |
| ४. | बाणडोंगरी, कांदिवली पूर्व, मुंबई येथे सोलार स्ट्रीट लाईट प्रदान करणे | २१,०७,७२०/- | २१०७७.०० | ४३०००/- सुरवातीला ५०% आणि ५०% देयक मार्फत | मुळ उत्पादक किंवा त्यांचा अधिकृत एजन्सी किंवा विदयुत ठेकेदार यांच्याकडे इलेक्ट्रिकल कॉन्ट्रक्टर परवाना आणि अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असावा. | ५९०/- | ३ महिने मान्सून सह |
| ५. | बिहारी टेकडी, गावदेवी रोड, कांदिवला- पूर्व, मुंबई येथे सोलार स्ट्रीट लाईट प्रदान करणे | २१,०७,७२०/- | २१०७७.०० | ४३०००/- सुरवातीला ५०% आणि ५०% देयक मार्फत | मुळ उत्पादक किंवा त्यांचा अधिकृत एजन्सी किंवा विदयुत ठेकेदार यांच्याकडे इलेक्ट्रिकल कॉन्ट्रक्टर परवाना आणि अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असावा. | ५९०/- | ३ महिने मान्सून सह |
| ६. | अप्पर गोविंद नगर, मालाड- पूर्व, मुंबई येथे सोलार स्ट्रीट लाईट प्रदान करणे | २१,०७,७२०/- | २१०७७.०० | ४३०००/- सुरवातीला ५०% आणि ५०% देयक मार्फत | मुळ उत्पादक किंवा त्यांचा अधिकृत एजन्सी किंवा विदयुत ठेकेदार यांच्याकडे इलेक्ट्रिकल कॉन्ट्रक्टर परवाना आणि अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असावा. | ५९०/- | ३ महिने मान्सून सह |
| ७ | राम नगर, कांदिवली पूर्व, मुंबई येथे सोलार स्ट्रीट लाईट प्रदान करणे | २१,०७,७२०/- | २१०७७.०० | ४३०००/- सुरवातीला ५०% आणि ५०% देयक मार्फत | मुळ उत्पादक किंवा त्यांचा अधिकृत एजन्सी किंवा विदयुत ठेकेदार यांच्याकडे इलेक्ट्रिकल कॉन्ट्रक्टर परवाना आणि अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असावा. | ५९०/- | ३ महिने मान्सून सह |

निविदेचे वेळापत्रक -

| अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|
| १. | निविदा प्रसिध्दीचा दिनांक | २१/०८/२०२४ |
| २. | निविदा विक्रीचा दिनांक | २१/०८/२०२४ सकाळी १०.३० वाजता |
| ३. | निविदा विक्रीचा अंतिम दिनांक | २७/०८/२०२४ सायंकाळी ०५.४५ वाजता |
| ४. | निविदा दाखल दिनांक | २१/०८/२०२४ सकाळी १०.३५ वाजता |
| ५. | निविदा दाखल अंतिम दिनांक | २७/०८/२०२४ सायंकाळी ०५.४५ वाजता |
| ६. | निविदा उघडण्याचा दिनांक | २९/०८/२०२४ सकाळी १०.३० वाजता |

निविदा प्रक्रीये संबंधातील संपूर्ण माहिती ऑनलाईन [e-tendering] मार्फत https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्राप्त होतील. शुध्दीकरण / ॲडिशन जर असेल तर फक्त वेबसाईटवर प्रकाशित केले जाईल.

सही/-
'कार्यकारी अभियंता
विदयुत विभाग / मुंबई मंडळ,
म्हाडा

CPRO/A/612

Follow us:@mhadaofficial

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

प्रेम ही अशी मोठी शक्ती आहे जी शत्रुचे रुपांतर मित्रांमध्ये करु शकते.



- मार्टिन लूथर किंग ज्युनियर

वृत्तमानस

मुंबई, बुधवार, २१ ऑगस्ट २०२४

# असंतोषाच्या स्फोटाची वाट पाहू नका

उरण मधील क्रूर अत्याचाराच्या घटनेने सर्वत्र असंतोषाचे वातावरण असतानाच बदलापूरमधील घटनेने लोकांच्या असंतोषाचा भडका उडाला. शाळेने माफीनामा मागून सुध्दा लोकांचा राग शांत झाला नाही. त्यांनी आज संपूर्ण बदलापूर शहर उलथून टाकले. चिमुकलांवर झालेल्या लैंगिक अत्याचाराचा घराघरात निषेध झाला कोलकाता आणि त्या नंतर मुंबई मध्ये महिला डॉक्टराला झालेल्या मारहाणीचा सिलसिला अजूनही थांबायला तयार नाही. कोलकाता येथे तर महिला डॉक्टर वर शारीरिक अत्याचार करून तिचा खून करण्यात आल्याने नेमके चालले आहे तरी काय असा प्रश्न पडावा. डॉक्टर म्हणजे रुग्णांचे प्राण वाचविणारा देवदूत अशी आपली सर्वांची लहानपणापासून धारणा असली तरी त्यामध्ये वयोपरत्वे आणि कालानुरूप बदल होत चालला आहे. रुग्णांच्या नातेवाईकांकडून डॉक्टरांना होणाऱ्या मारहाणीच्या घटना देशात अथवा राज्यात कुठे ना कुठे होत असतात. लॅन्सेटच्या अहवालानुसार २०१९ ते २०२३ या काळात भारतात आरोग्य कर्मचाऱ्यांवर प्राणघातक हल्ले झाल्याच्या किमान १७५ घटना नोंदवल्या गेलेल्या २०२३ आहेत. प्रत्यक्षात हा आकडा अजून बराच जास्त असू शकतो. व्हायोलन्स अगेनस्त हेल्थ वर्कर ही संघटना भारतातील आरोग्य कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या हल्ल्यांची नोंद घेते. त्यांच्या अहवालानुसार आरोग्य कर्मचाऱ्यांवर हल्ले होण्याच्या घटना दरवर्षी वाढत चालल्या असल्याने त्याला वेळीच पायबंद न घातल्यास हा सामाजिक चिंतेचा विषय बनू शकतो. मुळात आपल्या रुग्णालयांच्या सुरक्षिततेसाठी तोकडी यंत्रणा आजही कायम आहे. मुंबई असो की ठाणे दोन्ही महापालिका अथवा राज्यातील कोणतीही पालिका किंवा सार्वजनिक सरकारी रुग्णालयांमध्ये डॉक्टरांसह कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर आहे. सुरक्षा कटोकोट असल्याचा दावा मुंबई महापालिका करत असली तरीही प्रत्यक्ष स्थिती वेगळी आहे. मुंबई महापालिकेतील तीन हजार ८०९ सुरक्षा रक्षकांची पदे मंजूर असून त्यापैकी १ हजार ७९० सुरक्षा रक्षक हे रुग्णालये, जलाशयांसह विविध विभागांत तैनात आहेत. २ हजार १९ रिक्त पदे आहेत. महापालिका रुग्णालयांच्या सुरक्षेचा ताण कमी करण्यासाठी महाराष्ट्र सुरक्षा बल, ठाणे सुरक्षा मंडळ आणि खासगी सुरक्षा रक्षकांचीही मदत घेण्यात येते. एका माहितीनुसार सर्वाधिक गर्दी असलेली केईएम, सायन, नायर, कूपर रुग्णालये तसेच वैद्यकीय महाविद्यालयामधील सुरक्षा ही पालिकेच्या सुरक्षा रक्षकांबरोबरच एमएसएफ, खासगी आणि ठाणे सुरक्षा मंडळांवर आहे. महापालिकेच्या छोट्या रुग्णालयातील सुरक्षेची जबाबदारी महापालिकेच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांकडे आहे. सुरक्षा अधिकारी वर्गातही एकूण ९५ पदांपैकी ३१ जण कार्यरत आहेत. अनेकदा सुरक्षारक्षक असूनही तो लांब अंतरामुळे पोहचू शकत नाहीत. संप झाला की सुरक्षेच्या मुद्यावर रान उठते. सीसीटीव्हीची आश्वासने दिली जातात. सुरक्षेच्या मुद्यावर विद्यार्थ्यांनी रान उठवले की तक्रारीचा सूर आळवला जातो. रुग्णालय प्रशासनाने या मुद्यांवर पोलिस ठाण्यांत तक्रार करायला हवी. प्रत्यक्षात तसे अभावाने होते. महापालिका आणि सरकारी रुग्णालयांमध्ये वावरणाऱ्या महिला डॉक्टर, परिचारिका यांच्या मनात कोलकाता घटनेची पुनरावृत्ती मुंबईही होण्याची भीती आहे. प्रामुख्याने रात्र पाळीच्या वेळी हे अधिक जाणवते. काही वेळा रुग्णालयात पुरेसा औषधसाठा, साहित्य नसते. तजवीज करायला सांगितली की रुग्णाचे नातेवाईक चिडतात. रुग्णाच्या चिंतेने त्रासलेला नातेवाईक कसा वागेल, हे सांगता येत नाही. त्यामुळे हे सगळेच वातावरण असुरक्षित वाटते, असे परिचारिका, महिला डॉक्टर सांगतात. औषधांची उपलब्धता नसण्याची अनेकदा प्रशासकीय कारणे असतात. त्यांची चर्चा करता येत नाही. हा तोंड दाबून बुक्क्यांचा मार ठरतो. रुग्णाला तपासताना सेफ्टी गीअर अनेकदा मिळत नाहीत, अशा वेळी संसर्गाची भीती असते. गर्भवती परिचारिका व डॉक्टरांच्या शारीरिक गरजांचा विचार केला जात नाही. नव्याने रुजू होणाऱ्या विद्यार्थिनींसाठी रुग्णालयाचा परिसर नवा असतो. कोणता विभाग कुठे आहे हे समजून घेण्यासाठी पाच ते सहा महिन्यांचा कालावधी जातो. अनेक ठिकाणी दुरुस्तीची, पुनर्बांधणीची कामे सुरू आहे. काही विभाग, ओटी थिएटर, विनावापर पडीक आहे. अशा एकाकी निर्जन जागांची माहिती त्यांना नसते. मासिक पाळीच्या दिवसांमध्ये विश्रांतीसाठी लो. टिळक रुग्णालयामध्ये नवी इमारत तयार होत असून ही समाधानाची बाब मानावी लागेल. कधी कधी जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया, बांधकाम याला विलंब होतो. डॉक्टरांची संघटना, त्यातील सदस्य प्रत्येक वर्षी बदलतात. कोंडवाड्यासारख्या परिस्थितीचे व्हिडीओ सरकारपर्यंत गेले की घोषणा होतात. नवे विद्यार्थी जुनेच प्रश्न घेऊन मोकळा श्वास घेण्यासाठी जागा द्या म्हणत आंदोलनाला उभे राहतात. आश्वासने दिली जातात आणि नंतर सर्व विसरले जाते. सर्वात महत्वाचे म्हणजे कोणत्याही वेळी वैद्यकीय सेवा देण्यासाठी धावणारे निवासी डॉक्टर कशा परिस्थितीमध्ये राहतात याचा विचार कोणत्याही सरकारने आजपर्यंत गांभीर्याने केलेला नाही. पालिका तसेच सार्वजनिक रुग्णालयामध्ये येणाऱ्या रुग्णांचा रेटा सातत्याने वाढता असतो. जेवढे आजार तितक्या प्रकारचा संसर्ग. तिथे खासगी रुग्णालयांसारखे 'बारा रुग्ण एक डॉक्टर' हे गणित नसते. हे युवा डॉक्टर दहा ते बारा तास ऑन ड्युटी काम करतात. त्यांना अनेकदा संसर्ग होतात. ड्युटी नसेल त्यावेळी शांतपणे पाठ टेकावी इतकी जागा वसतिगृहातील रूममध्ये नसते. पालिका तसेच सार्वजनिक वसतिगृहांममध्ये एका खोलीत अक्षरक्ष तीन ते चार डॉक्टर कोंबलेले आहेत. कूपरला नवी वैद्यकीय महाविद्यालय इमारत मिळाल्यामुळे परिस्थिती समाधानकारक असली तरीही केईएम, लो. टिळक रुगणालयांच्या विद्यार्थ्यांसाठी सुविधांची वानवा आहे. अपुरी कोंदट जागा, कॉमन स्वच्छतागृह, खोलीतील दाटीवाटी मुळे अपुरी झोप, अभ्यासासाठी लायब्ररीत मुक्काम, खाण्यासाठी मेसचा नाहीतर खानावळीतून येणाऱ्या अन्नाचा आधार आणि भरीला रुग्णांचा वाढता रेटा. पदवी मिळेपर्यंत राहायचे, अशी समजूत काढत विद्यार्थी काडेपेटी इतक्या जागेत कोंबून घेतात. यातून नवीन डॉक्टर तयार होणार असतील तर अपेक्षा कोणाकडून करावी? मुंबईचा विचार केला तर नायर, केईएम, सायन अशा मोठ्या रुग्णालयांत रात्रीच्या वेळी एका इमारतीतून दुसऱ्या इमारतीतही जावे लागते, कधी रुग्ण आला तर ट्रॉली न्यावी लागते. हे सगळे अपुऱ्या प्रकाशात होते. याची चिंता डॉक्टर, परिचारिकांपासून चतुर्थ श्रेणीतील महिला कर्मचाऱ्यांना वाटते. याबद्दलच्या भावना या कर्मचाऱ्यांनी व्यक्त केल्या असल्याने प्रशासनाने यात वेळीच तातडीने लक्ष घातले पाहिजे. कोलकाता प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने स्वता दखल घेतल्यानंतर पोलीस यंत्रणा कामाला लागलीय. या घटनेचे रोड सर्वत्र पसरलेले असताना बदलापूर येथील घटनेने मात्र तेथील पोलिसांना माणुसकी दिसली नाही. बदलापूर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक महिला असतानाही त्यांनी त्या अत्याचारावर कठोर भूमिका घेतली नाही. कायदा राबवणारे पीडितांना न्याय मिळवून देण्यास सक्षम नाहीत म्हणूनच अशा घटना घडत असल्याचा राग जनतेमध्ये आहे. आजच्या बदलापूरच्या उत्स्फूर्त बंद मध्ये हेच दिसून येते आहे. शासनाने वेळीच या असंतोषाची दखल घेतली नाही तर त्याचा भडका शाकीय व्यवस्थेला जाळल्याशिवाय राहणार नाही असेच या आंदोलनातून दिसते आहे.

# खेळाडूंनी जबाबदारी घ्यावी

फ्रान्सची राजधानी असलेल्या पॅरिस येथे नुकतीच ऑलिंपिक स्पर्धा पार पडली. नेहमीप्रमाणे याही वेळी भारतीय खेळाडूंनी देशवासीयांची निराशा केली. पदक तालिकेत भारत ७१ व्या क्रमांकावर राहिला. यावेळी भारताला अवघी सहा पदके मिळाली. त्यात एक रौप्य पदक तर ५ कांस्य पदके मिळाली. १४५ कोटी लोकसंख्या असलेल्या देशाला अवघे सहा पदके मिळतात त्यात एकही सुवर्णपदक नसणे ही मोठी नामुष्कीची बाब आहे. मागील ऑलिंपिकमध्ये भारताला सात पदके होती त्यात एक सुवर्णपदकही होते यावेळी त्यापेक्षाही कमी पदके मिळाली. वास्तविक यावेळी भारताला पदकांचा दुहेरी आकडा गाठता येईल अशी अपेक्षा होती कारण यावेळी भारतीय संघ पूर्ण तयारीनिशी उतरला होता. ११७ खेळाडूंच्या भारतीय पथकात अनेक खेळाडू असे होते की ज्यांच्याकडून भारताला पदकांची आशा होती विशेषतः बॅडमिंटन, तिरंदाजी, टेबल टेनिस आणि कुस्ती या खेळातून भारताला यावेळी पदकांची अधिक आशा होती मात्र या सर्वांनी निराशा केली. बॅडमिंटन खेळाडू चौथ्या क्रमांकावर राहिले. जी गत बॅडिंटनटन खेळाडूंची झाली तीच तिरांदाजांची झाली.

टेबल टेनिसपटूंनी तर पूर्ण निराशा केली. कुस्तीमध्ये शेवटच्या क्षणी भारताला एक कांस्यपदक मिळाले. वास्तविक कुस्तीमध्ये भारताला आणखी पदकांची अपेक्षा होती.



नेमबाजांनी थोडीफार देशाची लाज राखली असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही त्यातही एकट्या मनू भाकरने दोन पदके मिळवले तिला सरबज्योत सिंग आणि स्वप्नील कुसाळेने साथ दिल्याने एकट्या नेमबाजीत भारताला तीन पदके मिळाली. भालाफेकपटू नीरज चोप्राने एक रौप्य तर हॉकी संघाला कांस्यपदक मिळाले अन्य खेळाडूंनी तर ऑलिंपिकमध्ये फक्त हजेरी लावण्याचे काम केले. भारताच्या या निराशाजनक कामगिरीची पूर्ण जबाबदारी ही खेळाडूंचीच आहे कारण सरकारने त्यांची जबाबदारी पूर्णपणे पार पाडली होती. सरकारने ऑलिंपिक तयारी साठी हजारो कोटी रुपये खर्च केले. खेळाडूंना हव्या त्या पूर्ण सोयी सुविधा दिल्या. खेळाडूंसाठी देशातील तसेच परदेशातीलही तज्ज्ञ प्रशिक्षक नेमले. खेळाडूंना सर्वोत्तम प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न सरकारने केला तरीही खेळाडू देशाला पदक जिंकून देऊ शकले नाही याला काय म्हणावे? पूर्वी सरकार खेळाकडे दुर्लक्ष करीत होते त्यांच्यावर खर्च करण्यास टाळाटाळ करीत होते तेंव्हा खेळाडू सरकारवर अपयशाचे खापर फोडून मोकळे व्हायचे पण आता त्यांना तसेही करता येणार नाही.

सरकारने त्यांना सर्वोत्तम प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न केला असतानाही खेळाडूंनी निराशाजनक कामगिरी केली ही चिंता वाढवणारी गोष्ट आहे. खेळाडूंनी आता जबाबदारी घ्यायला हवी. आता ऑलिंपिक स्पर्धा संपली आहे. भारताच्या निराशाजनक कामगिरीची दखल वरिष्ठ पातळीवर घेतली गेलीच असेल. या वेळी खेळाडूंकडून ज्या चुका झाल्या त्या पुढील ऑलिंपिक मध्ये होणार नाहीत याची दक्षता खेळाडूंनी घ्यायला हवी. पुढील ऑलिंपिकला आता चार वर्ष आहेत. यावेळी झाले ते झाले पुढच्या ऑलिंपिकमध्ये याची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता खेळाडूंनी घ्यायला हवी. आपल्या या निराशाजनक कामगिरीने देशवासीयांची निराशा तर होतेच पण देशाची मानही खाली झुकते याचे भान खेळाडूंनी ठेवायला हवे.

- श्याम ठाणेदार,
पुणे

# एक संवाद... शाळेशी

आज खूप वर्षांनी ही संधी मिळाली माझ्या शाळेशी बोलण्याची गेली 33 वर्ष ज्या वास्तूला मी पाहते जिच्या सानिध्यात वावरते जिच्या अंगा खांद्यावर खेळून स्वतःचे व्यक्तिमत्व अधिकाधिक प्रभावी करण्याचे सामर्थ्य मिळाले अशा माझ्या शाळेबद्दलची कृतघ्नता व्यक्त करण्याची ही संधी.

शाळा म्हटले की व्यक्ती परत्वे तिला अनेक संदर्भ प्राप्त होतात. शाळा म्हणजे जिथे मुलांना ज्ञानाची कवाडे उघडली जातात, सामाजिक जीवनात कसे वागावे याचे शिक्षण देणारी संस्था म्हणजे शाळा तर काहींच्या मते शिकून सवरून समाजात स्वतःच्या पायावर उभे करते ती शाळा. सारांश काय तर मुलांना घडवण्याचे काम करते ती शाळा पण मला मात्र शाळेबद्दल चा वेगळाच विचार समाजापुढे मांडायचा आहे. शाळा फक्त मुलांना घडवते असे नाही तर तिच्या सानिध्यात येणाऱ्या प्रत्येकावर संस्कार करण्याचे काम अविरतपणे करते तिच्या वास्तूत येणाऱ्या प्रत्येकाला त्याची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही

मी शाळेचा उल्लेख आता सखी म्हणून करणार आहे. "ए सखी, मी तुझ्या वास्तूत प्रवेश केला तो 1992 साली तुझी ती अतिशय देखणी इमारत, बाहेर छान छोटीशी बाग तुझ्यात श्रीमंतीचा देखावा नव्हता. आधुनिकीकरणाचा हव्यास नव्हता अशा ह्या तुझ्या वास्तूत मी शिक्षकाला आवश्यक असणाऱ्या सर्व पदव्या घेऊन मोठ्या अभिमानाने प्रवेश केला त्यावेळी मला तुझ्या वास्तूत नोकरी करायला मिळणार म्हणून माझ्या घरातील सर्व मंडळींना किती आनंद झाला होता म्हणून सांगू. मी प्रवेश केला तो दिवस होता गणेशोत्सवाचा दुसरा दिवस.अतिशय प्रसन्न वातावरण .प्रत्येक जण खेळीमेळीच्या वातावरणात काम करताना मला दिसले.शाळेचे मुख्याध्यापक उपमुख्याध्यापक सहकारी यांनी माझे स्वागत करून मला तुझ्या कुटुंबाचा एक सदस्य करून घेतले. तुझ्याशी माझी पहिल्यांदाच भेट झाली आणि तुझ्या ऋणानुबंधांना सुरुवात झाली. लोखंडाला परिसाचा स्पर्श व्हावा आणि त्याचे सोने व्हावे तसेच माझे झाले ग.मला सर्व अनुभवी शिक्षकांनी घडविण्यास सुरुवात केली. सखी इथे असणाऱ्या प्रत्येक शिक्षकात राहणीचा साधेपणा विचारांचा मोठेपणा होता. चारित्र्यसंपन्न ध्येयवादी विश्वासू शिक्षक आणि विद्यार्थी घडवणे हेच ध्येय विद्यार्थ्यांबरोबर निरंतर चालणारी शिक्षक घडणीची प्रक्रिया असे सगळे शैक्षणिक वातावरण मी शिकत गेले. घडत राहिले.सुरुवातीला त्याचे दडपण वाटत होते.त्याचाच मोठा आधार आता वाटू लागला आहे. बरोबरीचे सर्व शिक्षक अशा तऱ्हेने प्रेरित झालेले अध्ययन अभ्यासपूर्ण उपक्रम त्याच्यासाठी वेळेचा विचार कधीच नव्हता. विद्यार्थी शिक्षकाचे नाते निर्माण होत गेले. शिल्पकार जसा दगडाचा नको असलेला भाग काढून सुंदर मूर्ती तयार करतो तसेच या सर्वांनी माझ्यातील वाईट गुण काढून चांगले व्यक्तिमत्व घडण्याचा प्रयत्न केला पण सखी खरं सांगते हा बदल एवढा सोपा नव्हता बरं सतत मनात अनेक विचार येत होते. घरातील अनेक जबाबदाऱ्या आणि अडचणी शाळेच्या या सर्व मान्यवर मंडळींच्या अपेक्षा या सर्वांमुळे अनेक वाईट विचारही मनात येत होते पण त्याचवेळी तुझ्या कुशीत आले की मात्र मनाला वेगळे समाधान मिळत होते. मन पुन्हा फुलपाखरू होत असे व एका नव्या उमेदीने कामाला सुरुवात करत असे शाळेत काम करायचे हे बळ कोठून येत होते याचा विचार आता केला तर तूच डोळ्यासमोर येतेस. किती सावरलस ग.नोकरी नको म्हणत म्हणत सलग 33 वर्ष कधी सरली ते कळलच नाही

सखे तुला माहिती आहे मी ज्यावेळी नोकरीला लागले त्यावेळी मला माझे शिक्षण खूप आहे असे वाटत होते पण येथील सर्व शिक्षकांनी मला कळत नकळत ते शिक्षण तुटपुंज असल्याची जाणीव करून दिली. मी एकेक पदवी पदरात पाडत गेले शिक्षणातील सर्वोच्च पदवी आपण घ्यावी अशी इच्छा एकदा सहज बोलून दाखवल्यावर मला लगेच प्रोत्साहन मिळाले आणि आवश्यक असणारी सर्व मदतही. सखी आज मी डॉक्टर शुभांगी गायकवाड झाले.माझा आनंद गगनात मावत नव्हता.त्यादिवशी मी सर्वप्रथम भेटायला आले ते तुलाच तू ही अगदी प्रेमाने प्रवेशद्वाराचा फळा माझे नाव लिहून सजवून ठेवला होतास. तुला खरं सांगते त्यावेळी मी तुझ्या डोळ्यात दोन आनंदाश्रू पाहिले आणि माझ्या जीवनाचे सार्थक झाले. सखी जसजसे दिवस जात होते तसतसा वेगवेगळ्या जबाबदाऱ्या तू माझ्यावर टाकीत होतीस. मला त्या पेलताना खूप प्रश्न पडत होते पण मला माझ्या सहकाऱ्यांची साथ मिळाली अधिकाऱ्यांनी पाठिंबा दिला आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे संस्थेने विश्वास ठेवला त्याचमुळे हे सर्व समर्थपणे पेलू शकले.

सखी तू खरी ज्ञानगंगा आहेस भक्त पुंडलिकाच्या मातापित्यांची झोपमोड होऊ नये म्हणून त्याने भीमा नदीला खळखळाट न करता शांतपणे वाहण्याची विनंती केली त्याची मातृ-पितृ भक्ती पाहून प्रत्यक्ष पांडुरंगाने विटेवर उभे राहणे पसंत केले म्हणून भीम नदी शांतपणा स्वीकारून पुंडलिकास व त्याच्या मायबापाला वळसा घालून चंद्रकार धारण केला तशीच तू माझ्यासाठी चंद्रभागा झालीस

सखी मी खरोखरच भाग्यवान मला तुझी साथ मिळाली आज तुझ्या परिसस्पर्शाने माझे सोने झाले कसे आणि किती उपकार मानू. मला तुझ्या या ऋणातून कधीच मुक्त होता येणार नाही आज माझ्या या सखीसाठी एवढेच म्हणावेसे वाटते

**नाती नेहमी हृदयात फुलतात**
**मनात ठसतात**
**त्या नात्यांना रंग नसतो**
**स्पर्श नसतो**
**असतो फक्त जिव्हाळा**
**फक्त जिव्हाळा**

**- डॉ शुभांगी संतोष गायकवाड**
समुपदेशक
डी एस हायस्कूल, सायन

## पत्र मानस

### शास्त्रसंमत गणेशमूर्ती घरी आणा !

श्री गणेश चतुर्थीला थोडेच दिवस शिल्लक राहिल्यामुळे आपल्या पसंतीची मूर्ती मिळावी यासाठी आतापासूनच या विक्री केंद्रावर गणेश भक्तांची रीघ लागायला सुरुवात झाली आहे. मागील काही वर्षांपासून देवतांच्या विविध अवतारांतील तसेच अन्य देवतांच्या, संतांच्या आणि महापुरुषांच्या रुपातील गणेशमूर्ती या विक्री केंद्रांवर मिळू लागल्या आहेत. प्रसिद्ध खेळाडू, राजकारणी, चित्रपटांतील गाजलेल्या व्यक्तिरेखा यांसोबत लहानग्यांच्या कार्टून विश्वातील पात्रांच्या आकाराच्या गणेशमूर्तीही बनवल्या जाऊ लागल्या आहेत. गणेशोत्सव काळात अशा स्वरूपातील मूर्ती घरी आणून आपण पूजन आणि विसर्जन नेमके कोणाचे करणार आहोत ? श्री गणेशाची मूर्ती नेमकी कशी असावी याविषयीचे शास्त्रीय विवेचन श्री गणपती अथर्वशीर्षात सविस्तरपणे सांगितले आहे. त्यानुसार पाटावर किंवा चौरंगावर विराजमान मृत्तिकेची म्हणजेच मातीची गणेशमूर्तीच गणेश चतुर्थीला घरी आणावी असे शास्त्र आहे. त्याऐवजी विविध रूपातील गणेशमूर्ती आणून ती पुजल्याने पूजकाला त्यातून अपेक्षित लाभ होत नाही. उलट यातून श्री गणेशाचा अवमानच होतो. गणेशमूर्ती घरी आणताना आपली आवड निवड बाजूला ठेऊन शास्त्र विचारात घेतल्यास त्याचा लाभ आपल्याला निश्चितच होणार आहे, त्यामुळे यंदा अन्य कोणत्या रूपातील नव्हे, तर शास्त्रसंमत गणेशमूर्तींचे घरी आणूया.!

**- मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

### डॉक्टरांचे काम बंद आंदोलन रुग्णांना त्रासदायक

कोलकाता येथील आर जी कर या खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या केल्याच्या निषेधार्थ देशात अनेक सरकारी,खाजगी रुग्णालयातील डॉक्टरांचे आंदोलन सुरू आहे. त्यामुळे रुग्णालयातील वैद्यकीय रुग्ण उपचार सेवा विस्कळित झाली आहे. शस्त्रक्रियही रखडल्या आहेत.त्यामुळे रुग्णांचे हाल होत आहेत.कोलकाता येथील प्रकार निंदनीय आहे.सबंधित आरोपीस अटक करून जलद गती न्यायालयात खटला चालवून फाशीची शिक्षा झाली पाहिजे ही डॉक्टरांसह देशभरातील जनतेची मागणी आहे.तसेच डॉक्टरांवर रुग्णांच्या नातेवाईकांकडून वैद्यकीय सेवा करताना होणारे हल्ले विचारात घेता त्यांना सुरक्षा द्यावयास हवी याबाबत दुमत नाही.पण डॉक्टरांनी ह्या प्रकाराचा निषेध म्हणून काळया फिती लावून निषेध केला असता तर योग्य झाले असते.पण आजारी रुग्णांवर उपचार करण्याऐवजी रुग्ण सेवा ठप्प करणे हा डॉक्टरांचा मार्ग चुकीचा आहे.यासाठी डॉक्टरांच्या मार्ड संघटनेने आंदोलन स्थगित करून रुग्ण सेवा सुरळीत करावी व रुग्णांचे होणारे हाल थांबवावेत अशी देशभरातील जनता अपेक्षा करत आहे.

**- नंदकुमार आ पांचाळ, घोडपदेव मुंबई**

### लष्करी शिक्षण हवे !

राष्ट्रीयत्वाचे संस्कार रुजविण्यासाठी शालेय जीवनातच लष्करी प्रशिक्षण प्रत्येक विद्यार्थाला, विद्यार्थिनींना अनिवार्य करण्याची आवश्यकता असल्याचे सुमेधाताई चिथडे यांनी दिलेला विचार मौलिक असून आज खरोखरच त्याची अत्यंत आवश्यकता भासते आहे. जेणे करून त्यागातील आनंद, राष्ट्रप्रेम, योगदान, बंधुभाव, निरपेक्षता, कष्टाची किंमत आणि श्रमाची शक्ती, प्रतिकूल परिस्थिती ही धाडसाने सामना करण्याची वृत्ती, शिस्त या संस्कारांची होत असलेली घसरण निदान लष्करी शिक्षणाच्या माध्यमातून तरी जोपासली जाईल आणि याची सुरुवात शालेय शिक्षणाच्या पायरीवरून होणे महत्वपूर्ण आहे. एक उत्तम, सुसंस्कृत शिस्तबद्ध नागरिक यातून तयार होईल. हे ही नसे थोडके. संबंधितांनी यावर सकारात्मक निर्णय घेणे आवश्यक वाटते.

**- विश्वनाथ पंडित, ठाणे**

### भारतात लोकसंख्येच्या मानाने अपुरे डॉक्टर्स ...

जगातील प्रत्येक देशात सार्वजनिक आरोग्याला विशेष महत्व दिले जाते . जेथे आरोग्य चांगले असते तेथे लोक आनंदी व समाधानी असतात व ते आपल्या व्यवसायात किंवा नोकरीत जास्त चांगले लक्ष देऊ शकतात . भारतात दर दहा हजार लोकसंख्येच्या प्रमाणात केवळ ७. ३ एवढेच डॉक्टर्स आहेत भारतात दरडोई आरोग्यावरचा खर्च सुद्धा कमी आहे . २०२१ च्या जीडीपी प्रमाणे तो केवळ ३. ३ टक्के एवढाच आहे ही माहिती नुकतीच जागतिक आरोग्य संघटनेने प्रसारित केली आहे . जगाच्या अन्य देशाचा विचार करता तो भारता पेक्षा कितीतरी अधिक आहे . सर्वात जास्त डॉक्टर्स जर्मनी मध्ये असून दर दहा हजारामागे त्यांची संख्या ४५. २ एवढी आहे . तर इटली मध्ये ४२. ५ आहे . अमेरिका , फ्रांस, ब्रिटन हे देश जवळपास दहा हजार लोकसंख्येच्या प्रमाणात ३० पेक्षा जास्त डॉक्टर्स आहेत जागतिक सरासरीच्या विचार करता ती सरासरी दर दहा हजारांमागे २०. २ एवढी आहे . भारतात स्वातंत्र्यानंतर सुद्धा सात दशकांनंतर डॉक्टर्स कमी का असावेत ? एक तर वैद्यकीय शिक्षणासाठी खर्च फार येतो . जो सर्वसामान्य लोकांना परवडत नाही . हा व्यवसाय आहे त्या मुळे त्यातून किती प्राप्ती होईल याचा अंदाज बांधता येत नाही . त्यापेक्षा नोकरी बरी असे अनेकांना वाटते . देशात वैद्यकीय महाविद्यालयाची संख्या २०२४ करिता केवळ ६९५ एवढीच आहे त्यामध्ये एकूण जागा १०६३३३ एवढ्या आहेत . त्यापैकी सरकारी ५५६४८ व खाजगी ५०६८५ एवढ्या आहेत . तयामुळे वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी सुद्धा मोठी स्पर्धा व गर्दी असते यावर वैद्यकीय शिक्षणाच्या संधी वाढविणे, शिक्षणाचा खर्च क्रमी करणे, हे उपाय शासनाने करणे आवश्यक आहे . तरच डॉक्टर्स संख्या वाढेल व आरोग्याच्या सुविधा निर्माण होतील

**- शांताराम वाघ पुणे**

### लाडक्या बहिणीनो भावांचा स्वार्थ ओळखा

महायुतीने लोकसभेत दणकुन मार खाल्यानंतर विधानसभेतही आपली हीच परिस्थिति होणार या भीतीने मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यानी एक नवी योजना आणली.तीला मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण असे नाव दिले.या योजनेत प्रथम २१ ते ६० वर्षाच्या महिलाना दरमहा १५०० रुपये देण्याचे घोषित केले.ते देताना अनेक अटी होत्या पण त्या सर्व वगळून सरसकट सगळया महिलाना खिरापत वाटण्याची प्रक्रिया सुरु केली.ही योजना यशस्वी होण्यासाठी २०० कोटी खर्च केले.राज्यावर ९ लाख हजार कोटीच्या कर्जाचाही विचार केला नाही.काहीही करुन बहिणीना खुष करण्यासाठी महिला सक्षमीकरण असा प्रचार केला.वास्तविक सक्षमीकरण म्हणजे सन्मान, आदर असे म्हणता येईल पण महिलावरील अत्याचाराला आवर घालणे या भावाना जमले नाही.आता तर सरळसरळ या योजनेचा शुभारंभ करताना महायुतीला पुढील पाच वर्षे सत्ता दिली तर ही रक्कम दुप्पट केली जाईल अशीही घोषणा करण्यात आली.हे सक्षमीकरण आहे की मतांसाठी लालचीकरण? एका नेत्याने तर रक्कम परत घेतली जाईल अशी धमकी दिली.त्यामुळे महिलांची मते मिळण्यासाठी या तीन भावानी लाडक्या बहिणीची चाल रचली असल्याचे स्पष्ट झाले.वास्तविक महिलाना पैसे देण्याऐवजी आत्मनिर्भर केले असते तर बरे झाले असते.भाववाढ रोखण्याची हिम्मत या सरकारमध्ये नाही .बेरोजगारीवर उपाय नाही.महाराष्ट्रात आणलले उद्योग इतर राज्यात जात आहेत याकडे लक्ष नाही. पण सत्तेसाठी राज्याला कंगाल करुन विधानसभा निवडणुकीत महिलांची मते खेचण्याचा प्रयत्न लपुन राहिलेला नाही.सर्व बहीणीनी पैसे मिळाले म्हणून आपला स्वाभिमान या तीन भावाकडे गहाण ठेऊ नये.राज्याच्या सर्वकष परिस्थितीचा आणि या भावांच्या स्वार्थी वृत्तीचा विचार करुन मतदान करावे आणि महाराष्ट्राला वाचवावे.

**- अरुण पां.खटावकर, लालबाग**

## पिरकोन फणसवाडी मैत्री कट्टातर्फे लोकोपयोगी कामाची देणगी

**उरण :** उरण तालुक्यातील पिरकोन गावातील सारडे - वशेणी महामार्गावरील फणसवाडी सेक्टर ११ विभागातील मैत्री कट्टा मित्र परिवार ह्या कट्ट्यावर एकत्र जमणाऱ्या आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या होतकरू युवकांच्या माध्यमातून आज एक नाही तर तीन समाजपयोगी कार्य साकारण्यात आली.त्यातलं पहिलं सामाजिक कार्य म्हणजे उरण खारपाडा राष्ट्रीय महामार्ग ८६ या रस्त्यावरील पिरकोन - सारडे दरम्यान वशेणी - सारडे या दिशेकडून पिरकोन कडे येणाऱ्या वाहनांना तिथे असणारा गतिरोधक लगेचच लक्षात येत नसल्याने गतीरोधकावर जोरदार आदळत असतात स्वखर्चाने दिवसा आणि विशेषतः रात्री सुध्दा नजरेत पडावे असे रात्रीच्या काळोखात रेड लाईटने चमकणारे सोलर पॅनल सिग्नल रिफ्लेक्टर बसविण्यात आले.त्यानागोठणे येथील बंगालवाडी या दुर - दुर्गम आदिवासी वाडीवरील मुलाचा खेळतानां खालीपडून अपघात झाला त्यात त्या मुलाचे दोन्हीं हात जखमी ( फ्रेक्चर ) झाले दवाखान्यातील ऑपरेशनकरिता लागणाऱ्या खर्चासाठी मदतीचे हात पुढे केले.



## महत्त्वाचे

### बंदुकीचा धाक दाखवून सव्वा लाखांची लूट

**पनवेल :** पनवेल जवळील कर्नाळा अभयारण्यात पक्षी निरीक्षण करण्यासाठी गेलेल्या दोघा जणांना अज्ञात दोन व्यक्तींनी धारदार चाकू व छर्याच्या बंदुकीचा धाक दाखवून गळ्यातील सोन्याची चेन जबरीने चोरी केल्याची घटना पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. अय्यप्पन हरिहरसुब्रमण्यम (४५ रा.चेंबुर) व त्यांचे रविशंकर मंथा असे दोघे कर्नाळा अभयारण्यात पक्षी निरीक्षण करीत असताना या दोघांकडे दोन अज्ञात इसम आले व त्यांनी त्यांच्याकडील धारदार चाकू तसेच छर्याच्या बंदुकीचा धाक दाखवून अय्यप्पन हरिहरसुब्रमण्यम यांच्या गळ्यातील जवळपास १ लाख २० हजार रुपये किंमतीची १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन व अय्यप्पा स्वामींचे दोन ग्रॅमचे पेंडण असा सोन्याचा ऐवज काढून घेवून त्यांना धमकावून ते पसार झाले आहेत. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### विजेच्या खेळखंडोब्यामुळे नागरिक हैराण

**उरण :** उरण पूर्वविभागात मोठ्या प्रमाणावर विजेचा लपंडाव सुरू असल्याने उरण परिसरातील नागरिक हैराण झाले आहे. त्यामुळे कित्येक नागरिकांच्या घरातील विद्युत उपकरणे देखील खराब झालेली आहे. सतत होणाऱ्या वीज समस्येमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनशैलीवर देखील त्याचा परिणाम होत आहे. विशेष म्हणजे दर दिवसाआड १२ ते १३ तास रात्री अपरात्री कधीही वीजपुरवठा खंडित केला जात असून, महावितरणाच्या अधिकाऱ्यांचा आणि कर्मचाऱ्यांचा मनमानीपणा सुरू आहे यामुळे सर्वसामान्य जनता पिचली आहे.सतत वीज समस्या निर्माण होणे व रात्री अपरात्री वेळी अवेळी वीज पुरवठा खंडित होणे हे उरण पूर्व विभागातील नागरिकांच्या पाचवीलाच पुजले आहे. याशिवाय आत्ता सणासूदीच्या दिवसातही विज जैसे थे आहे. पावसामुळे परिसरात गवत वाढल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. रात्री वीज पुरवठा खंडित झाल्यावर डास चावणे व झोपमोड होणे अशा समस्या निर्माण होत आहेत.उरण पूर्व विभाग परिसरात सर्व कष्टकरी जनता राहत असून, रात्री नीट न झोप झाल्यामुळे त्यांच्या दैनंदिन दिनचर्येवर परिमाण होत आहे. मंगळवारी देखभाल दुरुस्तीच्या कामी सकाळी ४ वाजता खंडित झालेला विद्युत पुरवठा संध्याकाळी सहा शिवाय सुरळीत होत नाही. तसेच दिवसा खंडित झालेला वीजपुरवठा रात्री १२ नंतर सुरळीत होत आहे. या अनियमित वीजपुरवठामुळे उरण पूर्व विभागात कित्येक नागरिकांनी इन्व्हर्टर घेतले आहेत.

# अंबरनाथ-खोपोली दरम्यान 30 गाड्या रद्द

## 11 गाड्यांचे मार्ग वळवले



प्रतिनिधी
■ अंबरनाथ

शाळकरी मुलींवरील अत्याचाराच्या विरोधात बदलापूरमध्ये जनप्रक्षोप उसळला आहे. गेल्या 9 तासांपासून बदलापूरमध्ये रेल्वेमार्गावर आंदोलन सुरू आहे. आंदोलनामुळे अंबरनाथ ते खोपोली दरम्यान रेल्वेसेवा पूर्णपणे ठप्प झाली आहे.

अंबरनाथ-खोपोली मार्गावरील 30 गाड्या रद्द करण्यात आला आहे. तर 11 गाड्यांचे मार्ग वळवण्यात आले आहेत. मुंबईहून कोल्हापूरला जाणारी कोयना एक्प्रेस कल्याणहून मार्ग वळवून रवाना करण्यात आली.

दरम्यान, सीएसएमटी ते अंबरनाथपर्यंत रेल्वे सुरू करण्यात आल्या आहेत. अंबरनाथपर्यंत अप आणि डाऊन मार्गावरील गाड्या अंबरनाथपर्यंत सुरु झाल्याची घोषणा रेल्वेकडून करण्यात आली आहे. तर लांब पल्ल्याच्या गाड्या दुसऱ्या मार्गाने वळवण्यात आल्या आहेत.

# भीषण अपघातात दोन्ही कार चक्काचूर

■ बदलापूर

बदलापूर अंबरनाथ रोडवर एक धक्कादायक घटना घडलीय. एका कार चालकाने चार ते पाच जणांना चिडरल्याची घटना घडलीय. संध्याकाळी पाच ते साडेपाच दरम्यान झाली घटना घडलीय.

हाती आलेल्या माहितीनुसार, हा अपघात बदलापूरन डी मार्टमागे घडल्याचं सांगितलं जात आहे. हा अपघात जाणूनबुजून करण्यात आल्याचं सांगितलं जात आहे. दोन्ही अलिशान कारमधील व्यक्ती नातेवाईक असल्याची माहिती स्थानिकांनी दिलीय.

व्हिडिओमध्ये आपण पाहू शकतो की, काळ्या रंगाची कारने पांढऱ्या रंगाच्या कारमधील एका व्यक्तीला धडक दिली. त्यानंतर पुढे जाऊन यु टर्न घेतल्यानंतर परत काळ्या रंगाच्या कारने पांढऱ्या रंगाच्या कारला समोरून धडक दिली.

# रायगडच्या धैर्यशील पाटील यांना भाजपकडून राज्यसभेची उमेदवारी जाहीर

प्रतिनिधी
■ पेण

भाजपाकडून राज्यसभेच्या उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. भाजपाने रायगड जिल्ह्यातील धैर्यशील पाटील यांना राज्यसभेची उमेदवारी जाहीर केली आहे. गेल्या वर्षीच भाजपाने रायगडमध्ये शेतकरी कामगार पक्षाचा मोहरा गळाला लावला होता. आता दुसऱ्याच वर्षी पाटील यांना राज्यसभेची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

भाजपाने राज्यसभेसाठी नऊ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. यात आसामधून मिशनरंजन दास, रामेश्वर तेली. बिहारमधून मनन कुमार मिश्र, हरियाणामधून किरण चौधरी, मध्य प्रदेशमधून जॉर्ज कुरियन, महाराष्ट्रातून धैर्यशील पाटील, ओडिसा येथून ममता मेहंता, राजस्थान मधून सरदार रवनीत



सिंह बिट्टू, त्रिपुरा येथून राजीब भट्टाचार्जी यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

राज्यातील रिक्त झालेल्या राज्यसभेच्या दोन जागांसाठी निवडणूक झाल्यानंतर या दोन जागांवर कोण लढणार? याबाबत उत्सुकता निर्माण झाली होती. भाजपाचे नेते पीयूष गोयल आणि उदयनराजे भोसले यांची लोकसभेवर निवड झाल्याने या दोन जागा रिक्त झालेल्या आहेत. त्यामुळे या दोन्ही जागांवर भाजपा आपले उमेदवार देणार की त्यापैकी एक जागा मित्रपक्षाला देणार, याबाबत चर्चा सुरू होत्या. दरम्यान, आता भाजपाने यादी जाहीर करत एकाच जागेवर उमेदवार जाहीर केला आहे. राज्यसभेसाठी भाजपाकडून अनेकांची नावांची चर्चा होती. पण, रायगडच्या धैर्यशील पाटलांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला आहे. महाराष्ट्रासह देशातील नऊ राज्यांमध्ये रिक्त असलेल्या राज्यसभेच्या १२ जागांसाठी येत्या ३ सप्टेंबर रोजी निवडणुका होणार आहेत. तसेच त्याच दिवशी या निवडणुकीचा निकाल जाहीर केला जाईल. यात महाराष्ट्र विधानसभेतून राज्यसभेवर निवडून द्यावयाच्या दोन जागांचा समावेश आहे. साताऱ्च्या बदल्यात उदयनराजे भोसले यांच्या रिक्त होणाऱ्या राज्यसभेची जागा आम्हाला मिळणार आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लोकसभा निवडणुकीपूर्वीच म्हटले होते.

# 'मेडीकव्हर'मध्ये बॉम्ब ठेवल्याच्या मेलमुळे खळबळ

प्रतिनिधी
■ पनवेल

पनवेल शीव महामार्गालगत खारघर वसाहतीमधील मेडीकव्हर रुग्णालयाला सोमवारी संध्याकाळी सहा वाजण्याच्या सुमारास बॉम्बने रुग्णालय उडवून देऊ, असा ईमेल आल्याने सूरक्षा यंत्रणेसह रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची एकच धावपळ उडाली. अखेर अडीच तास रुग्णालयाची बॉम्ब शोधक पथकाने संपूर्ण तपासणी केल्यावर हा खोडसाळपणा असल्याचे सिद्ध झाले. परंतु हे अडीच तास रुग्ण व रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या जिवाचा ठोका चुकविणारे होते.

शंभराहून अधिक रुग्ण खारघर येथील मेडिकव्हर रुग्णालयात सोमवारी उपचार घेत होते. यातील अनेक रुग्ण अतिदक्षता विभागात असल्याने बॉम्बने रुग्णालयाची इमारत उडवून देण्याच्या धमकीमुळे अचानक रुग्ण इतर कोणत्या रुग्णालयात दाखल करावे, असा पेच निर्माण झाला. खारघर पोलिसांना याबाबत माहिती मेडिकव्हर रुग्णालयाच्या सूरक्षा विभागाचे मुख्य अधिकारी विनोद राऊत यांनी कळविली. पोलीस विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह बॉम्ब शोधक पथक, बॉम्ब नष्ट करणारे पथक आणि वाढीव पोलिसांचा बंदोबस्त काही क्षणात रुग्णालयात लावण्यात आला. याच दरम्यान नवी मुंबई पोलिसांचे सायबर सेल ज्या मेलवरुन धमकी देण्यात आली त्याच्या माग काढत होते. अखेर अडीच तासांच्या तपासणीनंतर पोलिसांनी सुटकेचा निश्वास सोडला. या दरम्यान रुग्ण भितीच्या सावटाखाली होते.

# महायुतीच्या विद्यमान आमदारांनाच पुन्हा उमेदवारी मिळणार

## बंडखोरीवर आठवलेंचे मोठे विधान

प्रतिनिधी
■ रोहा

राज्यात आणि देशात महायुतीचे सरकार आहे. अशातच विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर रायगड मधील महायुतीच्या घटक पक्षात वादंग निर्माण झाल्याचे पहावयास मिळतोय. अलिबाग मुरुड मतदारसंघ तसेच कर्जत खोपोली मतदारसंघात प्रामुख्याने हा वाद उफाळून आलाय. एकूणच राज्यातील महायुतीच्या बंडखोरीवर केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी भाष्य केले आहे. महायुतीत बंडखोरी होइल अस मला वाटत नाही. बंडखोरी योग्य नाही, राज्यात 170 ते 180.जागा निवडून येतील अशी खात्री आहे. ज्या ज्या ठिकाणी विद्यमान आमदार आहेत त्यांनाच ती जागा मिळणार असे



नामदार आठवले म्हणाले. सगळ्या पक्षांना मतदार संघात उमेदवारी बाबत मागणी करण्याचा अधिकार आहे. मात्र वरिष्ठ पातळीवर यावर निर्णय होईल. लोकसभेत आमचा पराभव झाला.मात्र त्याला अनेक कारणे आहेत .

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान बदलणार अशी चर्चा त्यावेळी मोठ्या प्रमाणावर करण्यात आली .अनेक अफवा पसरवण्यात आल्या. त्यामुळें आमचा पराभव झाला. परंतु नरेंद्र मोदी यांना हरविने येड्या गबाळ्याचे काम नाही, आम्हाला बहुमत मिळाले आहे असे रामदास आठवले माध्यमांशी बोलताना म्हणाले. नरेंद्र मोदी यांना बहुमत मिळालं आहे. येत्या विधानसभेत देखील सर्वत्र महायुतीचच सरकार येईल असे रामदास आठवले म्हणाले. महाराष्ट्रात सुध्दा आमचं सरकार येईल असा विश्वास आहे. पुढील निवडणुक ही विकासाच्या मुद्द्यावर होईल. आणि आमचे सरकार नक्की येईल असा दावा रामदास आठवले यांनी केला. राज्य आणि देशात युवती व महिलांवर होणारे अन्याय अत्याचार, हत्या या घटना रोखण्यासाठी गृहमंत्रालयाने तत्परतेने काम केल पाहिजे असे आठवले म्हणाले.

# पाच रुपयाच्या वादावरून बदलापुरात ॲसिड हल्ला

प्रतिनिधी
■ बदलापूर

बदलापूर रेल्वे स्थानकात पाच रुपयाच्या वादावरून तरुणावर ॲसिड हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यामध्ये तरुणाच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली आहे. बदलापूर रेल्वे स्थानकात शौचालयामध्ये जात असताना शौचालय चालक आणि तरुणामध्ये वाद झाला आहे. या प्रकरणात 28 वर्षीय तरुणाने 5 रुपये सुट्टे न दिल्याने शौचालय चालक आणि त्याच्या 15 वर्षीय अल्पवयीन मुलाने त्या तरुणाला बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. तसेच त्या घटनेनंतर त्या तरुणाच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकण्यात आले आहे. त्यामुळे त्या तरुणाच्या डोळयाला गंभीर दुखापत झाली आहे.

सकाळच्या सुमारास नेहमीप्रमाणे बदलापूर रेल्वे स्थानकांमध्ये प्रवाशी येण्याची वाट पाहत होते. त्यानंतर ते बदलापूर स्थानकातील शौचालयाचमध्ये गेले होते. त्यादरम्यान आरोपी बाप लेकाने विनायककडे शौचालयाचा वापर केल्याबद्दल पाच रुपयाची मागणी केली. मात्र विनायक यांच्याकडे सुट्टे 5 रुपये नसल्याने त्याने ते देण्यास नकार दिला. त्यावेळी आरोपी आणि त्याच्या मुलाने त्याला बेदम मारहाण केली आहे. त्यानंतर त्या चालकाच्या मुलाने विनायकच्या चेहऱ्यावर बाथरूम साफ करण्यासाठी असलेले ॲसिड फेकले आहे. सध्या त्याच्यावर एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण' योजनेअंतर्गत खाजगी आस्थापनांवर शासकीय विद्यावेतनासह प्रशिक्षणाची संधी

## 22 ऑगस्ट रोजी पालिकेच्या मुख्यालयात शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या 'मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण' योजनेबाबत शासन निर्णय क्र. संकीर्ण – 2024 /प्र.क्र.90/ व्यशि-3, दिनांक 9 जुलै, 2024 नुसार नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील हॉटेल्स, जाहिरात व अभियांत्रिकी इ. खाजगी आस्थापनांवर 6 महिन्यांच्या कालावधीकरीता शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षण देणेकामी विविध संवर्गातील एकूण 206 पदांसाठी खालील शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांकडून दि. 21 ऑगस्ट 2024 पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

याकरिता शिकाऊ उमेदवारांना प्रतिमहिना विद्यावेतन शासनामार्फत देण्यात येईल. यामध्ये - शैक्षणिक अर्हता 12 वी पास (HSC) : ₹ 6000/- तसेच आय.टी.आय./ पदविकाधारक : ₹ 8000/- आणि पदवीधर / पदव्युत्तर पदवीधारक : ₹ 10000/- याप्रमाणे विद्यावेतन राहील.

मेदवार किमान वय 18 व कमाल 35 वर्ष असावे. उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता 12 वी पास/ आय टी आय/ पदविका/ पदवी पदव्युत्तर असावी. मात्र शिक्षण चालू असलेले उमेदवार या योजनेत सहभागास पात्र असणार नाहीत. उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवासी असावा. उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे. उमेदवाराने कौशल्य, रोजगार व उदयोजकता आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करुन रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा.

आस्थापना/उदयोग महाराष्ट्र राज्यात कार्यरत असावा. आस्थापना/उदयोगाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी.

# उल्हासनगर मधील स्कायवॉक धोकादायक

## डागडूजी न केल्यास कोसळण्याची शक्यता

प्रतिनिधी
■ उल्हासनगर

उल्हासनगर रेल्वे स्थानकाजवळ बांधलेला स्कायवॉक हा धोकादायक असल्याचे मनपा प्रशासनाच्या स्ट्रक्चरल ऑडिट मध्ये नमूद केले आहे, या स्कायवॉकची त्वरित डागडूजी करणे आवश्यक असल्याचेही त्यात नमूद केले आहे . मात्र एम एम आर डी ए आणि उल्हासनगर मनपा प्रशासन ही जबाबदारी आपली नसल्याचे सांगत याप्रकरणी दुर्लक्ष करीत आहेत. हा स्कायवॉक कोसळल्यास मोठ्या प्रमाणात जीवित हानी व वित्तहानी होण्याची शक्यता असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याप्रकरणी जातीने लक्ष घालावे अशी मागणी एक हात मदतीचा या सामाजिक संघटनेचे अध्यक्ष विजय कदम यांनी केली आहे.



उल्हासनगरच्या मोडकळीस आलेल्या स्कायवॉक बाबत आम्ही उल्हासनगर मनपा प्रशासन, रेल्वे प्रशासन, एमएमआरडीए, राज्य शासन यांच्याकडे पाठपुरावा केला आहे मात्र सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षा व सुविधा याबाबत दुर्लक्ष करण्यात येते असे दुर्दैवाने म्हणावे लागते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे राज्यात अनेक योजना राबवत असल्याचे म्हणतात मात्र प्रत्यक्षात तसे दिसत नाही तरी त्यांनी याप्रकरणी जातीने लक्ष घालावे असे कदम यांनी म्हटले आहे.


उल्हासनगर रेल्वे स्थानकाजवळ पूर्व व पश्चिम भागाला जोडणाऱ्या स्कायवॉकचे बांधकाम 2008 मध्ये सुरू झाले होते, 2010 मध्ये हे बांधकाम पूर्ण झाले, यास स्कायवॉकचे उद्घाटन ठाणे जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री गणेश नाईक आणि एमएमआरडीएच्या सदस्यांच्या उपस्थितीत झाले होते. 34 कोटी रुपये खर्चून बांधलेले उल्हासनगर स्थानक पूर्व आणि पश्चिमेकडील लोकांना ये-जा करण्यासाठी बनवण्यात आले होते.

दुरवस्था झाली आहे. फरश्या तुटल्या आहेत, पिलर्स ढासळू लागले आहेत छप्परची तोडफोड झाली असून रेलिंग देखील अनेक ठिकाणी तुटलेल्या आहेत यामुळे पुलावरून जाणाऱ्या पादचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. यासंदर्भात आम्ही एमएमआरडीएकडे पाठपुरावा केला असता हा स्कायवॉक 2017 नंतर उल्हासनगर महानगरपालिकेच्या ताब्यात दिला आहे.

# पालिका मुख्यालयात स्व.राजीव गांधी जयंतीदिनी अभिवादन

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

सद्भावना दिवसानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे सद्भावना प्रतिज्ञा घेत माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या समवेत उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांनी सद्भावना दिवस प्रतिज्ञा ग्रहण केली.



"मी अशी प्रतिज्ञा करतो / करते की, मी जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता, सर्व भारतीय जनतेच भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करीन. मी आणखी अशी प्रतिज्ञा करतो/करते की, आमच्यामधील सर्व प्रकारचे मतभेद मी हिंसाचाराचा अवलंब न करता विचार विनिमय करून व संविधानिक मार्गाने सोडवीन" – अशा प्रकारची सद्भावना दिवस प्रतिज्ञा मोठ्या संख्येने उपस्थितांनी घेतली.

यावेळी प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत जवादे, विधी अधिकारी अभय जाधव, प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात, विलास मलुष्टे, दत्तात्रेय काळे आणि इतर अधिकारी – कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन' योजनेचे अर्ज भरुन लाभ घेण्याचे आवाहन

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

अनेक नागरिकांना पुण्यकर्म म्हणून तीर्थक्षेत्री जाण्याची आंतरिक इच्छा असूनही आर्थिक परिस्थितीमुळे अथवा कोणी सोबत नसल्याने तसेच पुरेशी माहिती नसल्याने जाणे शक्य होत नाही. यादृष्टीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र राज्यातील सर्व धर्मियांमधील 60 वर्षे व त्यावरील वयाच्या ज्येष्ठ नागरिकांकरिता 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना' राबविण्यात येत आहे.

या अंतर्गत भारतातील 73 व महाराष्ट्र राज्यातील 66 तीर्थक्षेत्रांची सूची सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या 14 जुलै 2024 रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या योजनेची माहिती नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ज्येष्ठ नागरिकांना मिळावी यादृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार नमुंमपा मुख्यालयात ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या व ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत योजनेविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.


## बृहन्मुंबई महानगरपालिका

### घन कचरा व्यवस्थापन

### ई-निविदा सूचना

बृहन्मुंबई महानगरपालिका (बृमनपा) कार्य. अभि. वाह. (शहर) विभागाच्या अंतर्गत भाडे तत्वावर ॲनिमल ॲम्ब्युलंस च्या १ नं. च्या पुरवठ्यासाठी ऑन लाईन बोली मागवित आहेत.

बोली महाराष्ट्र सरकारच्या (महाटेंडर्स) (http://mahatenders.gov.in) वरून तसेच बृमनपाच्या http://portal.mcgm.gov.in वरील "ई-प्रोक्युरमेंट" विभागामधून डाऊनलोड करता येतील. बोली सुरु दिनांक आणि वेळ २१.०८.२०२४ रोजी स. ११.०० वा. पासून बोली समाप्ती दिनांक २७.०८.२०२४ रोजी सायं. ०४.०० वा. पर्यंत.

इच्छुक बोलीदार निविदेच्या अधिक माहितीसाठी महाटेंडर पोर्टल http://mahatenders.gov.in ला भेट देऊ शकतात.

बोली कागदपत्रे टपालाद्वारे जारी किंवा स्वीकारली जाणार नाहीत.

पीआरओ/१०००/जाही/२०२४-२५

सही/-
कार्य. अभि. वाहतूक (शहर)

गप्पी मासे पाळा, मलेरिया टाळा.



## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'एच' नवघर माणिकपूर ता. वसई, जि. पालघर ४०१ २०२**

दुरध्वनी : ०२५० - २३३४३५४ ई-मेल : amch.vvmc@gov.com

जा.क्र. वविशम/- २६४४ /२०२४-२५ दिनांक :२०/०८/२०२४

### जाहीर नोटीस

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ ला अधिन राहुन या नोटीसीव्दारे वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरीकांना सूचित करण्यांत येते की, खालील नमुद मिळकत धारकांनी मालमत्ता हस्तांतरण कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. उक्त फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत / तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून सात (७) दिवसाच्या आत लेखी हरकत / तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी सदर हरकत / तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यांत येईल.


| अ. क्र | विभाग | मालमत्ता क्र. | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजेच विकणाऱ्याचे किंवा करदात्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | दिवाणमान ७ | VN30/16815 | चंदनवाला पंकज कोटडीया व इतर १ | रेखा जयराम ढोधी |
| २ . | बऱ्हामपुर | VN14/38834 | आल्फ्रेड फिलिप फर्नांडिस | ॲलवियो आल्फ्रेड फर्नांडीस व विनल आल्फ्रेड फर्नांडीस |
| ३. | बऱ्हामपुर | VN14/38565/5 | अनघा अजय बोथरे व राजेश चंद्रकांत वडके | मेघा किशोर पिंपळे |
| ४. | दिवाणमान ५/१ | VN26/13678 | बबिता संजय नारंग | विधुना विश्वनाथन |
| ५. | नवघर १/२ | VN04/24941 | प्रिती विष्णू वारंग व प्रसाद विष्णू वारंग | वंदना रमेश उपाध्याय |
| ६. | दिवाणमान ५/२ | VN27/12946 | अनंता सुरेश जोशी व सुरेश कृष्णराव जोशी | दिनेश शिवशंकर उपाध्याय व रुबी दिनेश उपाध्याय |
| ७. | चुळणा | VN02/55851 | खिमजी डुंगरसी छेडा व इतर ३ | सलीम रफिक मेमन |
| ८. | माणिकपूर १/३ | VN17/34282 | ग्रेगरी जेकब आल्मेडा | रोसिना ग्रेगरी आल्मेडा व इतर २ |
| ९ . | हामपुर | VN14/61905/2 | ज्योती अविनाश मदने | मनिषा जोसेफ भोसले व जोसेफ शांत्वन भोसले |
| १०. | माणिकपूर १/२ | VN16/33721 | फ्रान्सीस जोजेफ घोसाळ | अनिता चार्ली घोन्सालवीस |
| ११. | दिवाणमान ७ | VN30/17076 | रविंद्र अनंतराव जोशी | रावसाहेब गंगाधर रोहम |
| १२. | नवघर १/३ | VN05/24713 | रेहाना शब्बीर कपासी व इतर १ | वैभव शशिकांत देवधर व वैष्णवी वैभव देवधर |
| १३. | माणिकपूर १/३ | VN17/47270 | ग्रेगरी जेकब आल्मेडा | रोसिना ग्रेगरी आल्मेडा व इतर २ |
| १४. | दिवाणमान १ | VN22/42442 | आलेक्स इनास रॉड्रीक्स | नंदिनी आलेक्स रॉड्रीक्स व ॲलन आलेक्स रॉड्रीक्स |
| १५. | नवघर ४ / १ | VN09/43551 | लता बबन वाघमारे | भावना संतोष जाधव |
| १६. | बऱ्हामपुर | VN14/38834 | आल्फ्रेड फिलिप फर्नांडिस | ॲलवियो आल्फ्रेड फर्नांडीस व बिनल आल्फ्रेड फर्नांडीस |
| १७. | दिवाणमान ६ / १ | VN28/15205 | उषा दिनेश शर्मा | सुनंदा विनायक वाघमारे व विनायक आवजी वाघमारे |
| १८. | नवघर ४ / ३ | VN11/5310 | पीना नवनीतलाल कापडीया | राही इलेक्ट्रीकल्स प्रायव्हेट लिमिटेड |
| १९. | नवघर १/२ | VN04/21725 | स्वामीनाथ कांताराम यादव | रफिक मस्तान शा |
| २०. | बऱ्हामपुर | VN14/62156 | नयना किशोर चौधरी व इतर १ | विशाखा किशोर चौधरी |

शिक्का

सही/-
(निलेश म्हात्रे)
प्र. सहा. आयुक्त
प्रभाग समिती "एच"
वसई विरार शहर महानगरपालिका

## गुरुवारी पुण्यात पाणीपुरवठा राहणार बंद

**पुणे :** खडकवासला जॅकवेल, नवीन आणि जुने पर्वती जलशुद्धीकरण केंद्रासह अन्य ठिकाणी स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीची काम केली जाणार असल्याने शहराच्या बहुतांच्या भागाचा पाणीपुरवठा गुरुवारी दिनांक 22 ऑगस्ट 2024 रोजी बंद असणार आहे. तर शुक्रवारी म्हणजेच दिनांक 23 ऑगस्टला सकाळी उशिरा व कमी दाबाने पाणीपुरवठा सुरू होईल. भामा आसखेड धरणातून पूर्व भागात पाणीपुरवठा केला जातो. तेथील पाणीपुरवठा सुरळीत सुरू राहील अशी माहिती पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी दिली. पाणीपुरवठा बंद असणारा भाग पुढील प्रमाणे- पर्वती एम एल आर टाकी परिसर, गुरुवार पेठ, बुधवार पेठ, काशेवाडी कॉटर गेट परिसर, गंज पेठ, भवानी पेठ, नाना पेठ, लोहिया नगर, सोमवार पेठ, अरुण वैद्य स्टेडियम परिसर, घोरपडे पेठ, पर्वती दर्शन, मुकुंद नगर. पर्वती एच एल आर टाकी परिसर- सहकार नगर, पद्मावती, बिबवेवाडी, मुकुंद नगरचा काही भाग, महर्षी नगर, गंगाधाम, चिंतामणी नगर-भाग एक व दोन, लेक टाऊन, शिवतेज नगर, अप्पर इंदिरानगर, लोअर इंदिरानगर, शेळके वस्ती, महेश सोसायटी, बिबेवाडी गावठाण, प्रेम नगर, आंबेडकर नगर, डायस प्लॉट इत्यादी.



**म ह त्त्वा चे**

### पोहण्यासाठी गेलेल्या तरुणाचा पाय घसरुन मृत्यू

**जळगाव :** जळगाव जिल्ह्याच्या यावल तालुक्यातील निंबादेवी धरण पावसामुळे प्रवाहित झाले आहे. यामुळे येथे अनेकजण पर्यटनासाठी जात असतात. दरम्यान याठिकाणी मित्रांसह पोहण्यासाठी गेलेल्या तरुणाचा पाय घसरून पडल्याने पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी यावल पोलीस स्टेशनला नोंद करण्यात आली आहे. यावल तालुक्यातील निमगाव येथील वेदांत पाटील असे मृत तरुणाचे नाव आहे. निमगाव येथे आई- वडील, बहिण यांच्यासह राहत होता. वडील शेती काम करून परिवाराचा उदरनिर्वाह करतात. दरम्यान सातपुडा पर्वत रांगेत असलेल्या निंबा देवी येथील धरण पावसामुळे प्रवाहित झाले असल्याने येथे अनेकजण येत असतात. त्यानुसार रक्षाबंधननिमित्त सुट्टी असल्यामुळे निमगावातील काही तरुणांसोबत वेदांत पाटील हा निंबादेवी धरण येथे पोहोचण्यासाठी गेला होता. धरणाच्या सांडव्याच्या पाण्यामध्ये असलेल्या खड्ड्यात त्याचा पाय घसरून तो पाण्यात पडल्याने बुडायला लागला. वेदांत हा बुडत असल्याचे पाहून त्याच्या मित्रांनी आरडाओरडा केली. त्यावेळी आजूबाजूच्या नागरिकांनी धाव घेत त्याला वाचविण्यासाठी पाण्यात उडी घेतळी. मात्र तोपर्यंत वेदांत हा पाण्यात बुडाला होता. नागरिकांनी त्याचा मृतदेह बाहेर काढला. प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. डॉक्टरांनी त्याला मृत सांगितले.

### पार्सल उशिराने दिल्याने डिलिव्हरी बॉयला मारहाण

**संभाजीनगर :** ऑनलाईन खरेदी केलेल्या वस्तूचे पार्सल उशिराने आणले म्हणून डिलिव्हरी बॉयला एका पोलीस कर्मचाऱ्याने बेदम मारहाण केल्याची घटना छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये घडली आहे. या मारहाणीत डिलिव्हरी बॉय हा जखमी झाला आहे. या प्रकरणी गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर शहरातील जितेंद्र नावाचा तरुण हा वृत्तपत्र विक्रेता आहे. कुटूंबाला आर्थिक हातभार लागावा म्हणून वृत्तपत्र विक्री केल्या नंतर दिवसा फ्लिपकार्ट कंपनीसाठी डिलिव्हरी बॉय म्हणून काम करतो. दरम्यान या साईडवरून सिडको पोलीस ठाण्यातील कर्मचारी जीवन शेजवळ यांनी वास्तूचे बुकिंग केले होते. सोमवारी त्याच्याकडे एक पार्सल आले होते. ते पार्सल सिडको पोलीस ठाण्यात असलेल्या शेजवळ या कर्मचाऱ्यांचे होते.

# सीरम इन्स्टिट्यूट मंकीपॉक्स लस बनवणार

प्रतिनिधी
■ पुणे



कोरोना लस कोविशील्ड बनवणारी कंपनी सीरम इन्स्टिट्यूटने मंकीपॉक्स (Mpox) लस तयार करण्याची घोषणा केली आहे. कंपनीचे सीईओ अदर पूनावाला म्हणाले- Mpox ला जागतिक आरोग्य आणीबाणी घोषित केल्यानंतर, आम्ही लाखो लोकांना मदत करण्यासाठी एक लस विकसित करत आहोत. आशा आहे की आम्ही ती एका वर्षात पूर्ण करू.

एमपॉक्सच्या वाढत्या प्रकरणांमध्ये 19 ऑगस्ट रोजी केंद्र सरकारने देशातील सर्व बंदरे आणि विमानतळांसह पाकिस्तान आणि बांगलादेश सीमेवर अलर्ट जारी केला होता. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने अधिकाऱ्यांना बाहेरून येणाऱ्या प्रवाशांमध्ये मंकीपॉक्सच्या लक्षणांबाबत सतर्क राहण्यास सांगितले आहे. सध्या भारतात मंकीपॉक्सची लागण कोणालाही झालेली नाही. शेवटचे प्रकरण मार्च 2024 मध्ये उघडकीस आले होते.

19 ऑगस्ट रोजी आरोग्य मंत्रालयाने दिल्लीतील राम मनोहर लोहिया, सफदरजंग आणि लेडी हार्डिंग या केंद्राच्या तीन मोठ्या रुग्णालयांमध्ये नोडल केंद्रे तयार केली आहेत. मंकीपॉक्सच्या रुग्णांवर उपचार आणि काळजी घेण्यासाठी या रुग्णालयांमध्ये आयसोलेशन वॉर्ड तयार करण्यात आले आहेत.

केंद्राने सर्व राज्य सरकारांना त्यांच्या राज्यातील रुग्णालयांमध्ये मंकीपॉक्स रुग्णांसाठी आवश्यक व्यवस्था करण्याचे निर्देश दिले आहेत. अधिकाऱ्यांनी सांगितले की, आतापर्यंतच्या मूल्यांकनानुसार मंकीपॉक्सचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होण्याचा धोका कमी आहे. त्याला थोडक्यात Mpox म्हणतात.

WHO नुसार, 2022 पासून जगभरातील 116 देशांमध्ये मंकीपॉक्सची 99,176 प्रकरणे आणि 208 मृत्यूची नोंद झाली आहे. यावर्षी आतापर्यंत 15,600 हून अधिक प्रकरणे आणि 537 मृत्यूची नोंद झाली आहे. 2022 पासून, भारतात मंकीपॉक्सची 30 प्रकरणे नोंदवली गेली आहेत. शेवटचे प्रकरण मार्च 2024 मध्ये उघडकीस आले होते. भारतात माकडपॉक्सच्या चाचणीसाठी 32 प्रयोगशाळा आहेत.

जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) 14 ऑगस्ट रोजी मंकीपॉक्सला जागतिक सार्वजनिक आरोग्य आणीबाणी घोषित केले. या आजाराला आरोग्य आणीबाणी घोषित करण्याची 2 वर्षांतील ही दुसरी वेळ आहे. डब्ल्यूएचओ देखील चिंतित आहे कारण मंकीपॉक्सच्या वेगवेगळ्या प्रादुर्भावांमध्ये मृत्यू दर भिन्न आहेत. अनेक वेळा ते 10% पेक्षा जास्त झाले आहे.

डब्ल्यूएचओच्या म्हणण्यानुसार मंकीपॉक्सचा उगम आफ्रिकन देश कांगोमधून झाला आहे. त्यानंतर ते शेजारील देशांमध्ये झपाट्याने पसरले. आफ्रिकेतील 10 देशांना याचा गंभीर फटका बसला आहे. कोरोनाप्रमाणेच तो प्रवासातून जगाच्या विविध भागात पसरत आहे.

# मुंबई-गोवा महामार्गासाठी जनआक्रोश समितीकडून माणगाव बंदची हाक

## माणगाव बस स्थानकासमोर केले रास्ता रोको आंदोलन

प्रतिनिधी
■ माणगाव



मुंबई गोवा महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करा या मागणीसाठी जनआक्रोश समितीकडून आज माणगाव बंदची हाक देण्यात आली होती. या माणगावकरांनी कडकडीत बंद पाळत यास प्रतिसाद दिला. यानंतर आंदोलक आणि स्थानिकांनी रस्त्यावर उतरून महामार्गावर रास्ता रोको आंदोलनही केले. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

जनआक्रोश समितीच्या वतीने मुंबई गोवा महामार्गाच्या कामासाठी गेल्या सहा दिवसांपासून अमरण उपोषण सुरू होते. आंदोलन करणाऱ्यांशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फोनवर संवाद साधला होता. महामार्गाच्या प्रश्नाबाबत १९ ऑगस्ट रोजी मुंबईत बैठक बोलवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र ही बैठक झालीच नाही. आंदोलकांची प्रकृती खालावण्यास सुरुवात झाल्याने, जनआक्रोश समितीने मंगळवारी माणगाव बंदची हाक दिली होती. या बंदला माणगावकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सकाळच्या सत्रात संपूर्ण बाजारपेठ बंद ठेवण्यात आली होती. व्यापारी संघटनांनी बंदला पाठींबा दिला.

यानंतर शासनाच्या निष्क्रियतेचा निषेध करत आंदोलकांनी मुंबई गोवा महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. माणगाव बस स्थानकासमोर रस्त्यावर उतरत दोन्ही बाजूची वाहतूक रोखून धरली.

# पुण्यातील शाळेत अल्पवयीन मुलीवर अत्याचार

प्रतिनिधी
■ पुणे

बदलापूर पाठोपाठ आता पुण्यातील नामांकित शाळेत धक्कादायक प्रकार घडला आहे. अल्पवयीन मुलीवर शाळेतील विद्यार्थ्यानेच अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पुण्यातील भवानी पेठ परिसरात असलेल्या एका नामांकित शाळेत हा प्रकार घडला आहे. बंगला, बदलापुर, कळवा पाठोपाठ आता पुण्यातील या धक्कादायक प्रकाराने पुन्हा एकदा महिला आणि खास करुन लहान मुली सुरक्षित आहेत का? असा प्रश्न विचारला जात आहे.

धक्कादायक बाब म्हणजे 15 ऑगस्टच्या दिवशीच हा प्रकार घडला. पीडित मुलगी ही सातवीच्या वर्गात शिकणारी असून हा आरोपी तरुण देखील त्याच शाळेतील विद्यार्थी आहे. 19 वर्षीय देवराज



पदम आग्री असे आरोपी तरुणाचे नाव आहे. या तरुणाने शाळेतील स्वच्छतागृहात लैंगिक अत्याचार केल्याचे उघडकीस आले आहे.

समर्थ पोलीस ठाण्यात देवराज आग्री विरोधात गुन्हा दाखल असून त्याला अटक ही करण्यात आली आहे. पीडित मुलीच्या 30 वर्षीय आईने या प्रकरणी तक्रार दिली आहे. तसेच शाळेतील स्वच्छतागृहाजवळ हा प्रकार घडल्याच उघड झालं आहे. या तरुणावर समर्थ पोलीस ठाण्यात याप्रकरणी आरोपी विरोधात 74, 75 (1) (i) पोक्सो 8 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्रात लाजीरवाणा हा प्रकार घडला आहे. विद्यार्थी हे शाळेतही सुरक्षित नसेल तर हा सर्वात मोठा प्रश्न आहे. शाळांमधूनच असे प्रकार घडत आहेत, त्यामुळे मुलं शाळेत तरी सुरक्षित आहेत का? असा प्रश्न विचारण्यात येत आहे. तसेच हा तरुण 19 वर्षांचा आहे. त्यामुळे अल्पवयीन नसलेल्या या आरोपीवर कठोर कारवाई होणार का? याकडे साऱ्यांचं लक्ष आहे.

# महिलेचा वीज पडून मृत्यू

■ जळगाव

शेतात कामासाठी गेलेली महिला दिवसभर काम करून घरी परतत असताना त्यांचा अंगावर वीज पडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. सदरची घटना रावेर तालुक्यातील शिंगाडी गाव शिवारात घडली असून परिसरात खळबळ उडाली आहे. रावेर तालुक्यातील शिंगाडी येथील जुलेखा बी हैदर शा फकीर (वय ३५) असे मृत महिलेचे नाव आहे. जुलेखा बी या शेतमजुरी करून कुटुंबाला हातभार लावत होत्या. रोज शेतात जाऊन मजुरीचे काम करत होत्या. रोजप्रमाणे त्या गावातील महिलांसोबीत नेहमी प्रमाणे शेत मजुरी कामासाठी शेतात कामावर गेल्या होत्या. दुपारपर्यंत काम केल्यानंतर सर्व महिला घरी जाण्यासाठी निघाल्या. याचवेळी ढगाळ वातावरण होऊन विजा देखील चमकत होत्या.

# बलात्कार प्रकरणातील आरोपीला रस्त्यात ठेचा - आमदार संजय शिरसाट

प्रतिनिधी
■ संभाजीनगर

बदलापूरमधील दोन चिमुकल्यांवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेने महाराष्ट्र संतप्त झाला आहे. बदलापूरमध्ये गेल्या सहा तासांपासुन जनता रेल्वे ट्रॅकवर उतरली आहे. आरोपी नराधमाला फाशी द्या, शाळा प्रशासनावर कारवाई करा, आणि आठ दिवस होऊनही कारवाई न करणाऱ्या पोलिसांविरोधात कारवाई करण्याची मागणी संतप्त नागरिकांकडून होत आहे. यावर शिवसेना शिंदे गटाचे प्रवक्ते आमदार संजय शिरसाट म्हणाले, बदलापूर प्रकरणातील आरोपी



भेटला तर त्याला रस्त्यात ठेचा.

बदलापूर येथील घटनेत अत्याचार करणाऱ्यांना रस्त्यावर चिरडून मारलं पाहजे, अशी प्रतिक्रिया आमदार शिरसाट यांनी व्यक्त केली. ते म्हणाले की, बदलापूरमध्ये चार-चार वर्षांच्या दोन चिमुरड्यांवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला ठेचून मारले पाहिजे. एवढ्या लहान मुलांवर जर अत्याचार होत असेल तर अशा वेळेस कायदा गेला उडत. मी एक जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून बोलत आहे. काही लोकांना कायद्याचा धाक हा कायद्याच्या पद्धीतीने दाखवण्याचा प्रयत्न केला तर त्याचा काही सुद्धा फरक पडत नाही. त्यामुळे अशा नराधमांना सार्वजनिक ठिकाणी मारलं पाहिजे, ही भावना सामान्य जनतेची आहे आणि माझी सुद्धा आहे.

मुख्यमंत्री शिंदेंचे आमदार म्हणाले की, सरकार या प्रकरणी कारवाई करले, त्यात कुठेही मागेपुढे पाहणार नाही. उत्तर प्रदेश सरकारने जसा निर्णय घेतला तसा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला पाहिजे.

# पाणी आणि जात यांचा सहसंबंध अभ्यासायला हवा - पद्मश्री ओलवे



प्रतिनिधी
■ महाड

महाड ही क्रांतीभूमी आहे. या क्रांतीभूमीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी क्रांती घडवली. अजून तीन वर्षांनी महाडच्या सत्याग्रहाला शंभर वर्ष पूर्ण होतील. त्यानिमित्ताने पाणी आणि जाती यांचा सहसंबंध आपण अभ्यासायला हवा, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कीर्तीचे छायाचित्रकार पद्मश्री सुधारक ओलवे यांनी येथे केले .

कोकणातील आंबेडकरी चळवळीमधील साहित्यिक - कलावंत चळवळीचा चेहरा असलेल्या अपरान्त साहित्य कला प्रबोधिनीच्या वतीने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झालेल्या कोकणातील साहित्यिक, कलावंतांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन क्रांतीभूमी महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह येथे प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष प्रा. आनंद देवडेकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्षस्थानी अपरान्त साहित्य कला प्रबोधिनी, रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष डॉ. संजय खैरे होते. विचारमंचावर प्रबोधिनीचे केंद्रीय अध्यक्ष व जेष्ठ साहित्यिक ज. वि. पवार, सरचिटणीस सुनील हेतकर, संदेश पवार, कोषाध्यक्ष दीपक पवार, उपाध्यक्ष भावेश लोखंडे, संजय गमरे, मार्गदर्शक 'सोनबा' कार रमाकांत जाधव, सामाजिक कार्यकर्ते आणि सुरबानाना टिपणीस यांचे नातू मिलिंद टिपणीस आदी मान्यवर उपस्थित होते.

# 'भारत बंद'ला 'वंचित'चा पाठिंबा

प्रतिनिधी
■ पुणे






अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) संदर्भात 1 ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयने एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला. एससी आणि एसटी आरक्षणात आता उपवर्गीकरणाला मान्यता देत सर्वोच्च न्यायालयाने क्रिमीलेअर लागू करण्याचे निर्देश दिले. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात आरक्षण बचाओ समितीने 21 ऑगस्टला भारत बंदची घोषणा केली आहे. या बंदमध्ये बहुजन समाज पक्षासह विविध पक्ष, संघटना सहभागी आहेत. महाराष्ट्रातून प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वातील वंचित बहुजन आघाडी बंद मध्ये सहभागी होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने एससी आणि एसटीमध्ये उपवर्गीकरणाला मान्यता दिली आहे, वर्गीकरणाचे अधिकार राज्य सरकारांना देण्यात आले आहेत. कोर्टाने म्हटले आहे की एससी एसटी मधील अतिमागास जातींना आरक्षणाचा फायदा मिळाला पाहिजे. या निर्णयावरुन देशभरात एससी आणि एसटी समुदायात रोष आहे. या निर्णयाचा निषेध आणि संसदेतून हा निर्णय बदलला जावा यासाठी आरक्षण बचाओ समितीने 21 ऑगस्ट रोजी भारत बंदची घोषणा केली आहे. त्यासोबतच केंद्र सरकारने लॅट्रल एंट्रीचा निर्णय घेतला आहे. यामध्येही आरक्षण लागू नाही, याला काँग्रेससह विविध पक्ष, संघटनांचा विरोध आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर व्यापक चर्चा सुरु आहे. एससी, एसटी समाजाच्या खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेऊन हा निर्णय संसदेत बदलण्याची मागणी केली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या 10 ऑगस्टला झालेल्या बैठकीत एससी एसटींना क्रिमी लिअरचा निर्णय चुकीचा असल्याचे म्हटले गेले.

# राज्यात पुन्हा 'यलो अर्लट'

■ पुणे

हवामान विभागाने राज्यात पुढील तीन-चार दिवस मुसळधार पाऊस कोसळणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्कता बाळगावी असं आवाहन करण्यात आलं आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात पुढील तीन दिवस सर्वत्र पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तसेच आज आणि उद्या कोकणात वादळी वाऱ्यांसह सर्वत्र हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली जात आहेविजेच्या कडकडाटासह पावसाचा इशारा

सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीत काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तसेच मध्य महाराष्ट्रात देखील विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मराठवाड्यात ताशी 30 ते 40 किमी वेगाने वारे वाहू शकतात, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

# 'लाडकी बहिणी'मुळे एसटी प्रवाशांवर गदा, आगारातील सर्व फेऱ्या रद्द

प्रतिनिधी
■ पुणे/मुरुड

आता लाडकी बहिणी योजनेसाठी राज्य वाहीनी एसटी महामंडळाच्या गाड्यांचा वापर करण्यात येणार आहे. यासाठी अनेक एसटी बसेसना भाडे करारावर देण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील प्रवाशांचे वांदे होणार आहेत.

'मुख्यमंत्री बहिण माझी लाडकी' या योजनेची घोषणा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी पावसाळी अधिवेशनात अर्थसंकल्पात करण्यात आली होती. या योजनेचा फायदा नंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मिळतोय हे पाहाताच भाजपात अस्वस्थता पसरली. त्यानंतर या योजनेच्या नावाची 'मुख्यमंत्री'हा शब्द वगळून भाजपाचे नेते चंद्रकांत पाटील यांनी प्रचार सुरु केला. पुणे येथे 'मुख्यमंत्री बहिण माझी लाडकी' या योजनेच्या शुभारंभ करण्याचा कार्यक्रम तीन पक्षांच्या नेत्यांनी एकत्रपणे पुणे येथे आयोजित करण्यात आला. या मेळाव्यात तीन पक्षाचे नेते आवर्जून उपस्थित होते. त्यानंतर त्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते अजित पवार यांनी




मुंबईत काल मेळावा घेतला. या मेळाव्यात मुख्यमंत्री शब्द वगळून या योजनेचे नाव पोस्टरवर 'माझी बहिण लाडकी' असे करीत गुलाबी जाकीट घालून अजितदादांनी मोठा मेळावा घेतला. या योजनेचे श्रेय घेण्यासाठी महायुतीत आता मारामाऱ्या सुरु झाल्या आहेत. रत्नागिरी येथे 21 ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या कार्यक्रमासाठी राज्य परिवहन मुरुड आगारातील राज्य परिवहन मुरुड आगारातील राज्य परिवहनाच्या बसेस पुरविण्यात येणार आहेत. त्यामुळे 20 ते 21 ऑगस्ट रोजीच्या मुरुड आगारातून सुटणाऱ्या मुंबई, बोरीवली,कल्याण, धुळे, स्वारगेट, शिर्डी, ठाणे, पनवेल तसेच भांडुप या मार्गावरील बसेसच्या फेऱ्या रद्द करण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होणार आहे.

# नागरिक संरक्षण दलाकडून पास्थळ येथे प्रशिक्षण आयोजित

प्रतिनिधी
■ पालघर

महाराष्ट्र शासन गृह विभाग (विशेष) उपनियंत्रक नागरी संरक्षण दल जिल्हा पालघर अंतर्गत पास्थळ ग्रुप ग्रामपंचायत-सालगाव सभागृह येथे स्थानिक नागरिकांचा प्राथमिक प्रशिक्षण वर्ग आयोजित उपनियंत्रक नागरी संरक्षण दल, तारापूर जिल्हा पालघर कार्यालयामार्फत सहा. उपनियंत्रक के. आर. कुरकुटे यांच्या मार्गदर्शनानुसार विभागीय क्षेत्ररक्षक श्री. नरेश अनंत म्हस्के यांच्या प्रयत्नातून ग्रुप ग्रामपंचायत पास्थळ-सालगाव बोईसर येथे स्थानिक नागरिकांसाठी प्राथमिक प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

शत्रूच्या हल्ल्यापासून प्रत्येक व्यक्ती, मालमत्ता व संस्था यांचे संरक्षण करण्यासाठी नागरी संरक्षण कायदा १९६८ नुसार नागरी संरक्षण दलाची स्थापना करण्यात आली आहे. नागरी संरक्षण संघटनेची उभारणी सामाजातीन विविध स्तरातील लोकांना नागरी संरक्षणविषयक प्रशिक्षण देऊन स्वयंसेवक म्हणून




भरती करून करण्यात येते. कोणत्याही आपत्तीच्या प्रसंगी जसे पूर, भूकंप, दहशतवादी डल्ला, आग स्फोट इत्यादी वेळी नागरी संरक्षण संघटनेचे प्रशिक्षित कर्मचारी व स्वयंसेवक महत्वाच्या इतर शासकीय संस्था पोहोचण्यापूर्वी दुर्घटना स्थळी लोकांना मदत व बचावकार्य करते. दुर्घटनेनंतर पहिले काही क्षणच सुटका व बचाव कार्याच्या दृष्टीने महत्वाचे असतात.

नैसर्गिक आपत्ती व मानव निर्मित आपत्तीचा धोका वाढलेला आहे या दृष्टीकोनातून नागरी संरक्षणचे महत्व फक्त शत्रूच्या हल्ल्यापासून बचाव करण्यापुरते न राहता आपत्कालीन परिस्थितीतदेखील त्यांची भूमिका महत्वाची ठरत आहे. नागरी संरक्षण दल सर्वसामान्य स्तरातील नागरिकांपासून तयार झालेले असल्याने विमोचन मदत व पुनर्वसन याव्यतिरिक्त समाज निर्माण क्षमता व जनजागृती यासारखे महत्वाचे कार्य तसेच कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीशी सामना करण्यासाठी नागरी संरक्षण दलाचा वापर केला जात आहे.

# ई केवायसीसाठी बँकांच्या बाहेर एक किलोमीटरपर्यंत रांग

## 'लाडकी बहीण' योजनेचा लाभ घेण्यासाठी गर्दी

प्रतिनिधी
■ नंदुरबार

राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना बँक खाते केवायसी असल्याशिवाय अकाउंटवर पैसे येत नाही. यामुळे बँक खाते आधारही लिंक करून केवायसी करण्यासाठी लाभार्थी महिलांची मोठी गर्दी होत असून महिलांचे हाल होत आहेत. यातअनेक बँकांमध्ये एक किलोमीटरपर्यंत मोठ्या रांगा दिसून येत आहे.

नंदुरबार जिल्हा हा दुर्गम भागातून ग्रामीण भागात बँकांची संख्या कमी असल्याने तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या बँकांमध्ये महिला लाभार्थ्यांची त्यांची मोठी गर्दी दिसून येत आहे. लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी महिलांनी अर्ज भरले आहेत. यासाठी दिलेल्या बँक खात्याचे केवायसी असणे गरजेचे आहे. दरम्यान लाडकी बहीण योजनेचे पैसे लाभार्थ्यांच्या खात्यात येण्यास सुरुवात झाली असली तरी या योजनेसाठी महिलांनी दिलेल्या बँक अकाउंट केवायसी आवश्यक आहे. यामुळे शहादा शहरातील बँकांमध्ये महिलांची मोठी गर्दी दिसून येत आहे.

अगदी पहाटेपासूनच बँकांमध्ये केवायसी करण्यासाठी महिलांच्या रांगा लागत असल्याचे पाहण्यास मिळत आहे.

# रामदास कदमांचा भाजपकडून जाहीर निषेध




प्रतिनिधी
■ मोखाडा

कोकणात लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणुकांपूर्वीच महायुतीमध्येच खडाखडी सुरू झाली आहे. शिवसेनेचे नेते माजी पर्यावरणमंत्री रामदास कदम यांनी मंत्री रवींद्र चव्हाण यांच्यावर केलेल्या बेताल वक्तव्य बद्दल भाजपाचे तालुकाध्यक्ष संतोष चोथे यांच्या नेतृत्वात आज मंगळवार दिनांक २० ऑगस्ट रोजी मोखाडा(बिरसा मुंडा चौक) येथे जाहीर निषेध आंदोलन तसेच रामदास कदम यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले. याप्रसंगी भाजपा मोखाडा तालुका अध्यक्ष संतोष चोथे,भाजपा जिल्हा सचिव विठ्ठल पाटील,भाजपा भ.वि.आघाडी प्रदेश उपाध्यक्ष दीपक पाटील, माजी जि.प.सदस्य दिलीप गाटे,युवा मोर्चा ता.अध्यक्ष नरेंद्र चौधरी,उपसरपंच उमेश येलमामे,नामदेव पाटील,अल्काताई बुधर, नगरसेवक तथा बांधकाम सभापती प्रतीक पाघारे,दिशांत पाटील,शुभम डींगोर,मिलिंद काळे,किशोर भवारी,भूषण फाळके,हर्षल बात्रे,राजू माळी,हरी जाधव,जयपाल पाटील,धर्मा लाहारे,भास्कर चौधरी,नितेश गोंदके व इतर कार्यकर्ते तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

## फायजा, महेंद्र, अभिषेक, आंचल यांना सुवर्ण

**मुंबई :** नुकत्याच वर्धा (नागपूर) येथे झालेल्या सब ज्युनिअर, ज्युनिअर, सिनिअर राज्यस्तरीय थांग - ता मार्शल आर्ट्स स्पर्धेत फायजा अन्सारी, महेंद्र शर्मा, अभिषेक सहानी, आंचल सहानी यांनी शानदार कामगिरी करताना सुवर्ण पदके जिंकली. ऋतिक मौर्या, झिक्रा शेख यांनी रौप्य आणि सत्यम चौधरी , नोकी अली मोडल यांनी कांस्य पदके मिळवली. पदक विजेत्या खेळाडूंना गौरव अशोक पांचाळ यांचे मार्गदर्शन मिळाले. हे सर्व खेळाडू मालाड, मालवणीच्या आयडियल इंग्लीश हायस्कूल, होली एन्जल हायस्कूल , भवन्स महाविद्यालयात शिकत आहेत. या सर्व खेळाडूंनी या स्पर्धेत मुंबई उपनगर संघाचे प्रतिनिधित्व केले.



## 'षटकार किंग' युवराज सिंगवर बायोपिक बनणार

### क्रिकेट कारकीर्द व जीवन दाखवले जाणार



वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली

दिग्गज भारतीय क्रिकेटपटू युवराज सिंगच्या जीवनावर चित्रपट बनणार आहे. भूषण कुमार आणि रवी भागचंदका युवीच्या बायोपिकची निर्मिती करणार आहेत. चित्रपट समीक्षक तरण आदर्श यांनी पोस्ट शेअर करून ही माहिती दिली आहे.या घोषणेनंतर युवराज सिंगनेही प्रतिक्रिया दिली आहे. मीडिया ब्रीफिंग दरम्यान, युवी म्हणाला की त्याला आशा आहे की त्याचा बायोपिक लाखो लोकांना त्यांच्या आव्हानांवर मात करण्यासाठी प्रेरित करेल.

युवीच्या बायोपिकची घोषणा करताना तरण आदर्श यांनी पोस्टमध्ये लिहिले - 'क्रिकेटपटू युवराज सिंगवर बायोपिकची घोषणा करत आहे... भूषण कुमार आणि रवी भागचंदका हे क्रिकेट लीजेंड युवराज सिंगचे विलक्षण आयुष्य मोठ्या पडद्यावर आणतील. या चित्रपटाचे नाव अद्याप ठरलेले नाही, मात्र त्याची संपूर्ण क्रिकेट कारकीर्द आणि जीवन यात दाखवण्यात येणार आहे.

### युवी म्हणाला- क्रिकेट माझे सर्वात मोठे प्रेम आहे

*आपल्या बायोपिकबद्दल युवराज सिंग म्हणाला, 'मला खूप सन्मान वाटत आहे. माझी कथा जगभरातील लाखो चाहत्यांना दाखवली जाईल. क्रिकेट हे माझे सर्वात मोठे प्रेम आहे आणि सर्व चढ-उतारांदरम्यान शक्तीचा स्रोत आहे. मला आशा आहे की हा चित्रपट इतरांना त्यांच्या आव्हानांवर मात करण्यासाठी आणि त्यांच्या स्वप्नांचा अतूट उत्कटतेने पाठपुरावा करण्यास प्रेरित करेल.*

## आयपीएलमुळे बीसीसीआयवर पैशांचा पाऊस...

### यंदा बोर्डाने मिळवली ५१२० कोटी रुपयांची विक्रमी कमाई




वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली

एकेकाळी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ म्हणजे बीसीसीआयकडे १९८३ मध्ये वर्ल्ड कप विजेत्या संघाला सन्मानित करण्यासाठी पुरेसे पैसे नव्हते. पण आज हे क्रिकेट बोर्ड जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेट बोर्ड आहे. बीसीसीआयला जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेट बोर्ड बनवण्यात इंडियन प्रीमियर लीगने सर्वात मोठी भूमिका बजावली आहे. दरवर्षी क्रिकेट बोर्डाला आयपीएलमधून हजारो कोटींची कमाई होत असते. यंदाही आयपीएलमधून क्रिकेट बोर्डाने तब्बल ५१२० कोटी रुपयांची बक्कळ कमाई केली आहे. हे लक्षात घेऊन जगातील इतर देशांनीही आपल्या देशात अशा क्रिकेट लीग सुरू केल्या आहेत.

बीसीसीआयने २०२३ ते २०२७ या कालावधीत आयपीएलच्या नवीन मीडिया अधिकारांमधून बंपर कमाई केली आहे. बीसीसीआयने ४८,३९० कोटी रुपयांमध्ये मीडिया हक्कांचा करार केला होता. यामध्ये डिस्ने हॉट स्टारने २३ ,५७५ कोटी रुपयांना आयपीएलचे टीव्ही हक्क विकत घेतले होते. तर वायकॉम-१८ च्या जिओ सिनेमाने २३ ,७५८ कोटी रुपयांना आयपीएलचे डिजिटल अधिकार विकत घेतले होते. याशिवाय बीसीसीआयने आयपीएलचे टायटल स्पॉन्सर टाटा सन्सला ५ वर्षांसाठी विकले आहे, ज्यामुळे बीसीसीआयला २ ,५०० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. त्याच वेळी, My Circle-११ ने RuPay, angel One आणि Ceat कडून सहयोगी प्रायोजकत्व म्हणून १४८५ कोटी रुपये कमावले आहेत.

आयपीएल २००८ मध्ये सुरू झाली. या लीगपूर्वी बीसीसीआयकडे उत्पन्नाचे कोणतेही विशेष साधन नव्हते. पण आयपीएल सुरू झाल्यानंतर बीसीसीआयने उत्पन्नाच्या बाबतीत सर्व क्रिकेट बोर्डांना मागे टाकले आणि नंबर-१ स्थान मिळवले. आता आयपीएल पाहता अनेक देशांनी आपापल्या देशात क्रिकेट लीग सुरू केल्या आहेत.

खरंतर, बीसीसीआयच्या २०२२ -२३ च्या वार्षिक अहवालानुसार या दैनिकाने हा खुलासा केला आहे. या अहवालात असे सांगण्यात आले आहे की, आयपीएल-२०२३ पासून बीसीसीआयचे एकूण उत्पन्न वर्षानुवर्षे ७८ % वाढून ११ ,७६९ कोटी रुपये झाले आहे. तर खर्चही ६६ टक्क्यांनी वाढून ६,६४८ कोटींवर पोहोचला आहे. वार्षिक अहवालात असे सांगण्यात आले की, बोर्डाचे मीडिया अधिकार उत्पन्न आयपीएल-२०२२ मधील ३ ,७८० कोटी रुपयांच्या तुलनेत आयपीएल २०२३ पासून १३१ % वाढून ८,७४४ कोटी रुपये झाले.

### IPL-२०२३ मधील ऐतिहासिक कमाई

*एका नामवंत इंग्रजी दैनिकाच्या अहवालात म्हटले आहे की, बीसीसीआयने २०२४ मध्ये आयपीएलमधून ऐतिहासिक कमाई केली आहे. ही रक्कम आयपीएल-२०२३च्या पेक्षा ५००० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. बीसीसीआयने आयपीएल-२०२३ मधून सुमारे ५१२० कोटी रुपये कमावले होते, जे आयपीएल-२०२२ च्या कमाईपेक्षा ११६ टक्के जास्त होते. आयपीएल-२०२२ मध्ये बीसीसीआयचे उत्पन्न २३६७ कोटी रुपये होते.*

## एका षटकात 39 धावा, विश्वविक्रम मोडला

### T-20 सामन्यात सामोआच्या फलंदाजाचे 6 चेंडूत 6 षटकार

वृत्तसंस्था
■ अपिया



टी २० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एका षटकात सर्वाधिक धावा करण्याचा नवा विश्वविक्रम रचला आहे. टी २० विश्वचषक पात्रता फेरीतील सामोआ आणि वानुआतू यांच्यातील सामन्यादरम्यान हा विक्रम केला गेला.सामोआचा फलंदाज डॅरियस व्हिसरने मंगळवारी टी-२० विश्वचषक पात्रता सामन्यात वानुआतुचा गोलंदाज नलिन निपिकोच्या षटकात ६ चेंडूत ६ षटकार ठोकले. या ओव्हरमध्ये ३ नो बॉलचाही समावेश होता. यासह टी २० आंतरराष्ट्रीय सामन्यातील एका षटकात सर्वाधिक धावा करण्याचा ३९ धावांचा विक्रम रचला.

यापूर्वीचा विक्रम ३६ धावांचा होता. भारताचा युवराज सिंग, वेस्ट इंडिजचा किरॉन पोलार्ड आणि निकोलस पूरन आणि नेपाळचा दीपेंद्र अरी यांनी एका षटकात 6 षटकारांसह ३६ धावा करण्याचा पराक्रम केला आहे. फलंदाज म्हणून एका षटकात सर्वाधिक धावा करण्याच्या विक्रमाची बरोबरी डेरियस व्हिसरने केली आहे. पण, ३ नो-बॉल्समुळे, टी-२० इंटरनॅशनलच्या एका षटकात सर्वाधिक धावा करण्याचा विश्वविक्रम बनला आहे. सामोआची राजधानी अपिया येथे खेळवण्यात आलेला हा सामना सामोआने १० धावांनी जिंकला. टि२० आंतरराष्ट्रीय सामन्यात एका षटकात ६ षटकार मारणारा व्हिसर हा चौथा फलंदाज आहे. त्याच्या आधी भारताचा युवराज सिंग, वेस्ट इंडिजचा किरॉन पोलार्ड आणि नेपाळचा दीपेंद्र सिंग ऐरी यांनी एका षटकात ६ षटकार ठोकले आहेत. सर्वप्रथम युवराजने २००७ टी-२०वर्ल्ड कपमध्ये इंग्लंडच्या स्टुअर्ट ब्रॉडविरुद्ध ६ चेंडूत ६ षटकार ठोकले होते.

दुसरीकडे, नलिन निपिको एका षटकात ३६ किंवा त्याहून अधिक धावा देणारा सहावा गोलंदाज ठरला आहे. त्याच्या आधी स्टुअर्ट ब्रॉड (२००७), अकिला धनंजय (२०२१) , करीम जनात (२०२४), कामरान खान (२०२४) आणि अजमतुल्ला ओमरझाई (२०२४) यांनी षटकात ३६ धावा दिल्या आहेत.

### टी २०त शतक झळकावणारा व्हिसर सामोआचा पहिला खेळाडू

*टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात शतक झळकावणारा डॅरियस विसर हा सामोआचा पहिला खेळाडू ठरला आहे. तो चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आला. त्याने सुरुवातीपासूनच आक्रमक फलंदाजी केली. विसरने अवघ्या ६२ चेंडूत 132 धावांची शानदार खेळी केली. या काळात त्याच्या बॅटमधून ५ चौकार आणि १४ षटकार आले.व्हिसरच्या खेळीच्या जोरावर समोआने २० षटकांत 174 धावा केल्या. प्रत्युत्तरात वानुआतु संघाला ९ विकेट्सवर केवळ 164 धावा करता आल्या. ६ षटकार मारणारा वेगवान गोलंदाज नलिन निपिको याने सर्वाधिक ७३ धावांची खेळी खेळली.*

## बीओबी चाचणी कॅरम स्पर्धेत सिध्दी, जितेंद्र, सुशांत, मिलिंदची विजयी सलामी

प्रतिनिधी
■ मुंबई

बँक ऑफ बडोदा-मुंबई विभागीय कॅरम संघ निवड चाचणी स्पर्धेमध्ये सिध्दी तोडणकर, जितेंद्र मिठबावकर, सुशांत गिरकर, मिलिंद मोरे, आशितोष भालसिंग, ऐश्वर्य मिश्रा आदींनी सलामीचे सामने जिंकले. महिला एकेरीत सिध्दी तोडणकरने सुरुवातीपासून राणीवर कब्जा मिळवीत सामन्यावर वर्चस्व राखले आणि सिध्दीने दिव्या दीक्षितचे आव्हान १०-२ असे संपुष्टात आणले. बँक ऑफ बडोदा-मुंबई विभागतर्फे आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी सहकार्याने परेल येथील आरएमएमएस सभागृहात सुरु झालेल्या चाचणी कॅरम स्पर्धेत एकूण ७६ खेळाडूंनी भाग घेतला आहे.




पुरुष एकेरीत जितेंद्र मिठबावकरने प्रथमपासून अचूक फटकेबाजी करीत इक्बाल खानविरुध्द पहिल्या दोन बोर्डात १२-० अशी मोठी आघाडी घेतली. परिणामी दडपणाखाली खेळतांना इक्बाल खानचे हातचे बोर्ड निसटले. अखेर जितेंद्र मिठबावकरने १८-० असा विजय मिळवीत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. सुशांत गिरकरने सहज जाणाऱ्या सोंगट्याचे सातत्य राखत आशु चंद्रला २५-० असा नील गेम दिला आणि पहिली फेरी जिंकली. अन्य सामन्यात ऐश्वर्य मिश्राने अभय वैद्यला ६-४ असे, मिलिंद मोरेने रवी ओरायनला १४-० असे, आशितोष भालसिंगने विशाल चौखेला ११-० असे तर आशुतोष डोंगरेने अजय सिंगला १२-० असे हरवून प्रारंभीच्या लढतीमध्ये विजय संपादन केला. पहिल्या चार क्रमांकाचे विजेते कॅरमपटू, चेन्नई येथे २९ ऑगस्टपासून होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील आंतर विभागीय बीओबी कॅरम स्पर्धेमध्ये बँक ऑफ बडोदा-मुंबई विभागीय पुरुष व महिला कॅरम संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

## भाजप आमदार अमित साटम यांनी अंधेरी सबवेच्या पूर समस्येवर बीएमसीला सुचवले विविध उपाय

### जलवाहिन्या नेटवर्कची क्षमता वाढवणे; नाला रुंदीकरण करणे

प्रतिनिधी
■ मुंबई

अंधेरी सबवे येथील पुराच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी अंधेरी (पश्चिम) येथील भाजप आमदार अमीत साटम यांनी मिलन सबवे आणि हिंदमाताच्या धर्तीवर भूमिगत टाकी टाकी बांधणे यासह अनेक उपाय महापालिकेला सुचवले आहेत.

साटम यांनी 8 ऑगस्ट 2024 रोजी अंधेरी सबवे येथे पावसाच्या पाण्यामुळे होणाऱ्या पुरपरिस्थिती कारणांचा अभ्यास करण्यासाठी SWD आणि प्रभाग अधिकाऱ्यांसह अंधेरी सबवेला भेट दिली. या भेटीनंतर साटम यांनी बीएमसीचे अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांना सविस्तर पत्र लिहून पुराची कारणे आणि त्या समस्येवर उचित आणि व्यवहार्य उपाय सुचवले आहेत.

अंधेरी सबवे या पावसाळ्यात आजपर्यंत २८ वेळा बंद झाला आहे. प्रत्येक प्रसंगी किमान १५ मिनिटांपासून ते कमाल ४ तासांपर्यंत बंद झाला होता. त्यामुळे मायक्रो-टनेलिंग योजनेवर ६०० कोटी रुपयांचा खर्च करणे हे व्यवहार्य नसल्याचे साटम यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. ते पुढे म्हणाले की, SWD विभागालाही ही योजना अव्यवहार्य असल्याचे आढळले आहे. अंधेरी सबवे भेटीदरम्यान पूर्वेकडून पश्चिमेकडे येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहामुळे भुयारी मार्गात पाणी साचत असल्याचे दिसून आले असल्याचे साटम यांनी सांगितले. म्हणून, बीएमसीने पूर्वेकडील बाजूस जमिनीच्या खाली किंवा इतर कोणत्याही मोकळ्या जागेवर किंवा रस्त्याच्या खाली एक भूमिगत टाकी बांधावी. ज्यामुळे पूर्वेकडून पावसाचे येणारे पाणी हे मिलन सबवे प्रमाणे भूमिगत टाकीमध्ये जमा होईल, असे साटम म्हणाले.

भूगर्भीय सर्वेक्षण आणि आयआयटी तज्ञांशी सल्लामसलत केल्यानंतर बीएमसीने शक्य तितके पाणी शोषून घेण्यासाठी स्टॉर्मवॉटर ड्रेनमध्ये पावसाचे पाणी साठवण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंगची कार्यवाही करावी, अशी सूचनाही साटम यांनी केली. बीएमसीला केलेल्या इतर सुचनांमध्ये SV रोडवरील पर्जन्य जलवाहिन्या नेटवर्कची क्षमता वाढवणे, पूर्वेकडील सांडपाणी पाणी कमी करण्यासाठी मलनिस्सारण नेटवर्क क्षमता वाढवणे, आणि मिलियनेअर बिल्डिंगपासून सुरू होणारा नाला रुंदीकरण यांचा समावेश असल्याचे साटम यांनी स्पष्ट केले. हे उपाययोजना केल्यास अंधेरी सबवे (भुयारी मार्ग) येथे पाणी साचण्याचे प्रमाण कमी होईल. हे फार मोठा खर्च न करताही होईल आणि त्यामुळे जनतेचा पैसा वाचेल. त्याच वेळी नागरिकांना दिलासाही मिळेल, असे साटम पुढे म्हणाले.

## कर्मचाऱ्यांच्या काम चुकारपणामुळे बुडतोय पालिकेचा लाखोंचा महसूल!

### मनपा एल विभागात कर निर्धारण व संकलन खात्यातील अर्ज धूळ खात पडून !

प्रतिनिधी
■ मुंबई

महानगर पालिकेच्या कारभाराविषयी नेहमीच टीका केली जाते. कुर्ला एल विभागातील सहा. कर निर्धारण व संकलन खात्यात २०२१ ते २०२४ दरम्यान कर निर्धारित करण्यासाठी आलेले अनेक अर्ज धूळ खात पडून असल्याने पालिकेचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. आपला कर निर्धारित करण्यासाठी अर्जदार अनेकवेळा एल विभागाच्या खेटे मारत असून त्यांच्या मार्फत पालिकेला उत्पन्न मिळणार आहे. मात्र संबंधित विभाग त्याकडे सोयीने दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे.

पालिकेच्या प्रत्येक प्रभागात सहा. कर निर्धारण व संकलन खाते महत्त्वाचे असून या खात्यातून पालिकेच्या तिजोरीत मोठ्या प्रमाणात मालमत्ता करातून महसूल जमा होतो. या खात्यातील निरीक्षक आपापल्या विभागात जाऊन जमीन, बांधकाम, घर, झोपडे,इमारती यांना कार्य व अधिकारानुसार पाहणी करून कर निर्धारण करतात. कर निर्धारण, नावात बदल, एरिया वाढविणे, नवीन कर निर्धारण करणे याबाबत आलेल्या अर्जावर निर्णय घेऊन वरिष्ठांना अहवाल देऊन कर वाढविण्याचे काम करतात. अर्ज आल्यापासून ८ ते १० दिवसात त्यावर योग्य ती कार्यवाही करून कर निर्धारण करणे आवश्यक आहे. मात्र एल विभागातील सहा. कर निर्धारण व संकलन अधिकाऱ्यांकडे आलेले अर्ज एक दोन वर्षे तसेच पडून असल्याचा आरोप माहिती अधिकार कार्यकर्ते मनोहर जरियाल यांनी केला आहे. याबाबत २०२१ ते २०२४ या दरम्यान कर निर्धारण करण्यासाठी किती अर्ज आले व त्यातील किती निकाली काढले याची माहिती मागविली होती मात्र जनमाहिती अधिकारी व खाते प्रमुखांनी दिशाभूल करणारी माहिती दिली.

कर निर्धारण करण्यासाठी आलेल्या अर्ज ८ ते १० दिवसात निकाली लावून त्यातून पालिकेला मालमत्ता कराच्या माध्यमातून महसूल मिळवून देणे संबंधित खाते प्रमुखाचे कर्तव्य आहे. मात्र एल विभागात मालमत्ता करातून महसूल मिळवून देणारे अर्ज धूळखात पडून असल्याचा आरोप देखील मनोहर जरियाल यांनी केला आहे. याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईसाठी पालिकेच्या दक्षता विभागाकडे तक्रार केली आहे.



*मुंबई : शिवसेना (उध्दव ठाकरे) दक्षिण रायगड जिल्हा संपर्कप्रमुख पदी नागेन्द्र राठोड ह्यांची नियुक्ती झाल्याबद्दल दक्षिण रायगड जिल्हा पदाधिकाऱ्यांनी शिवसेना भवन येथे झालेल्या बैठकीमध्ये त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी दक्षिण रायगड जिल्हा प्रमुख अनिल नवघणे, दक्षिण रायगड समन्वयक बळीराम घाग, श्री हनुमान जगताप, महाड विधानसभा संपर्क प्रमुख अमित मोरे, श्रीवर्धन विधानसभा संपर्क प्रमुख सुजित तांदळेकर, महाड विधानसभा सह संपर्कप्रमुख चंद्रकांत धोंडगे, तालुका संघटक दिलीप करंदीकर, सितराम मेस्त्री, माणगाव तालुका संपर्कप्रमुख संजय साखळे, पोलादपूर तालुका संपर्कप्रमुख सतीश शेलार, रोहा तालुका संपर्कप्रमुख शैलेश फुलारे, योगेश गायकर, हरिश्चंद्र महातले, सुनील जाईलकर व शिवसैनिक उपस्थित होते.*

## भारतातील पहिल्या गॅस्ट्रो एआय अकादमीची स्थापना

### आरोग्य सेवेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराला मिळेल चालना



■ मुंबई

आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी एंडोस्कोपीमधील देशातील आघाडीची आरोग्य सेवा तंत्रज्ञान कंपनी फुजीफिल्म ने भारतातील पहिली गॅस्ट्रो एआय अकादमी स्थापन करण्यासाठी विविध रुग्णालयासोबत शैक्षणिक भागीदार म्हणून हातमिळवणी केली आहे. एचएन रिलायन्स हॉस्पिटलमध्ये एका कार्यक्रमादरम्यान अकादमीचा शुभारंभ करण्यात आला. फुजिफिल्म ने आरोग्य सेवा तंत्रज्ञान सुधारण्यासाठी, देशातील अनेक नामवंत गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्टनी गॅस्ट्रो एआय अकादमी स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी क्षेत्रात बदल घडवून आणणे हा या अकादमीच्या स्थापनेचा उद्देश आहे. या अकादमी अंतर्गत जीआय फिजिशियन आणि शल्यचिकित्सकांना मोफत एआय बाबत शिक्षण दिले जाईल आणि त्यांना रूग्णांची चांगली काळजी घेण्यासाठी आणि उपचारांमध्ये सुधारणा करण्यासाठी सर्व आवश्यक ज्ञान आणि कौशल्ये सुसज्ज केली जातील. आरोग्यसेवा तज्ञ भविष्यात समाजाच्या भल्यासाठी तंत्रज्ञानाच्या वापरासाठी तयार आणि जागरूक राहतील हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

डॉ अमित मायडो, अध्यक्ष, इन्स्टिट्यूट ऑफ गॅस्ट्रोसायन्स, एचएन रिलायन्स हॉस्पिटल, एक प्रतिष्ठित गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट असून ते एआय बाबत आपल्या भाषणात म्हणाले की, "गॅस्ट्रोएन्टेरोलॉजीचे क्षेत्र नेहमीच अत्याधुनिक शोध आणि तंत्रज्ञानाने पुढे जात आहे. यामुळे रुग्णांच्या सेवेमध्ये सुधारणा झाली आहे, हॉस्पिटलमध्ये राहण्याचे प्रमाण कमी होऊन आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर झाला आहे. आरोग्यसेवा ही एक मोठी उपलब्धी आहे आणि जगभरात या दिशेने अनेक प्रकल्प राबविले जात आहेत. डॉ. राजकुमार वाधवा, अपोलो हॉस्पिटल्सचे प्रख्यात गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट म्हणाले की , "भारतातील गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट जीआय संबंधित रोगांचे उपचार आणि निदान सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत, आम्ही यूएस, युरोपमधील अकादमीचे आभारी आहोत जपान आणि इतर अनेक देशांतील एआय तज्ञांकडून मिळालेले समर्थन हे उल्लेखनीय आहे असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

## काम आणि कुटुंबात समतोल राखण्याची डाबर आमलाची मोहीम




■ मुंबई

रक्षाबंधननिमित्त डाबर आमला भाऊ आणि बहिणींमधील अतूट नाते साजरे करत असून आपल्या नवीन मोहिमेच्या निमित्ताने आपल्याला प्रियजनांपासून दूर ठेवणा-या आजच्या जीवनातील अडचणींवर प्रकाश टाकला आहे. मोहिमेची कथा एका मोठ्या भावावर आधारित आहे जो त्याच्या कामामुळे घरी जाऊ शकत नाही, परंतु सणांच्या वेळी त्याच्या कुटुंबासोबत असण्याचे महत्त्व त्याला समजते. या मोहिमेद्वारे डाबर आमला लोकांना काम आणि कुटुंबात समतोल राखण्याचा, त्यांच्या प्रियजनांसोबत वेळ घालवण्याचा आणि त्यांच्यासोबत एकत्र सण साजरा करण्याचा संदेश देतो.

आजच्या युगात, जग तंत्रज्ञान-सक्षम होत चालले आहे, दरम्यान भाऊ आणि बहिणी अनेकदा एकमेकांपासून दूर जातात, त्यांना परंपरा आणि सण एकत्र साजरे करता येत नाहीत. डाबर आमला हा ब्रँड लांब, दाट आणि मजबूत केसांसाठी ओळखला जातो त्याचप्रमाणे डाबर आमलाची नवीन मोहीम प्रेक्षकांना कुटुंबासोबत वेळ घालवण्याचा आणि त्यांच्या मुळांशी घट्ट जोडून राहण्याचा संदेश देते.

## नागरिकांच्या समस्या न सोडविल्यास शिवसेना स्टाईलने उत्तर देऊ – खा. संजय पाटील

प्रतिनिधी
■ मुंबई

पालिकेच्या मनमानी कारभाराविरुध्द त्रस्त झालेल्या नागरिकांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी ईशान्य मुंबई महाविकास आघाडीचे खासदार संजय दिना पाटील यांनी आज एस विभागातील पालिकेच्या अधिका-यांची बैठक घेऊन त्यांना जाब विचारला. हलगर्जीपणा करणारे अधिकारी, कर्मचा-यांवर कुठलाही मुलाजमा न ठेवता कारवाई करण्यात यावी, अन्यथा शिवसेना स्टाईलने उत्तर देऊ, असा सज्जड दमच त्यांनी उपस्थित अधिका-यांना दिला.



मुंबई महापालिकेच्या 'एस' विभागांतर्गत भांडुप, कांजुर मार्ग, विक्रोळी व पवईचा काही भाग येतो. या भागातील समस्यांबाबत मोठ्या प्रमाणावर तक्रारी खासदार संजय दिना पाटील यांच्याकडे आल्या होत्या. रस्त्यांवरील खड्डे, ना दुरुस्त सिग्नल व्यवस्था, वाहतुकीचा खोळंबा तसेच सुलभ शौचालयाची दुरावस्था, पथ दिवे, आरोग्य विभाग यांचा ढिसाळ कारभार पाहता मुंबई महानगरपालिका लोकांच्या जीवाशी खेळ करीत असल्याचे दिसून आले. याबाबत ईशान्य मुंबई महाविकास आघाडीचे खासदार संजय दिना पाटील यांनी गंभीर दखल घेत मुंबई महानगरपालिका, पोलीस, बेस्ट अधिका-यांची तातडीची बैठक घेण्यात आली. नागरिकांचे सर्व प्रश्न त्यांनी मुंबई मनपा उपायुक्त संतोषकुमार धोंडे यांच्यासमोर मांडले. अनेक भागात वाहतुकीचा खोळंबा होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

ठिकठिकाणी बेकायदेशीर हातगाडीवाले रस्ता अडवून व्यवसाय करतात. त्यामुळे वाहतुक समस्या निर्माण होतात. अशा हातगाड्यावर कारवाई करण्यात यावी, ज्या हातगाड्यांवर कारवाई करण्यात आली आहे, अशा गाड्या पुन्हा रस्त्यावर दिसता कामा नये. रस्त्यांवरील खड्डे तातडीने भरण्यात यावे, बंद असलेले पथ दिवे दुरुस्त करा, नव्याने सार्वजनिक शौचालये बांधण्यात यावीत, खराब शौचालयांची दुरुस्ती करा. आरोग्याच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर हलगर्जीपणा होत असून नागरिकांच्या जीवाशी खेळ खेळला जातोय. त्याबाबत हलगर्जीपणा करणा-या अधिका-यावर कठोर कारवाई करण्यात यावी. सात दिवसांच्या आत कार्यवाही न झाल्यास शिवसेना स्टाईल ने उत्तर द्यावे लागेल असा इशारा खासदार संजय दिना पाटील यांनी दिला. या बैठकीला शिवसेनेचे आमदार रमेश कोरगावकर, युवा सेना कार्यकरीणी सदस्य राजोल पाटील, विभागातील नगरसेवक तसेच शाखाप्रमुख या बैठकीला उपस्थित होते.

## इम्रान खान ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या चॅन्सेलरपदाची निवडणूक लढवणार

**इस्लामाबाद:** वर्षभरापासून पाकिस्तानच्या तुरुंगात असलेल्या इम्रान खान यांनी ब्रिटनच्या ऑक्सफर्ड विद्यापीठाचे चान्सेलर होण्यासाठी अर्ज केला आहे. इम्रान यांचे सल्लागार सय्यद जुल्फिकार बुखारी यांनी सोशल मीडियावर याबाबत माहिती दिली. बुखारी म्हणाले की, इम्रान यांनी निवडणूक लढवण्यास होकार दिला आहे. त्यांनी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी चान्सलर इलेक्शन 2024 साठी अर्ज सादर केला आहे. 28 ऑक्टोबर रोजी ही निवडणूक होणार आहे. ऑक्सफर्डच्या 800 वर्षांच्या इतिहासात प्रथमच चान्सेलर पदाच्या निवडणुकीसाठी ऑनलाइन मतदान होणार आहे. बुखारी म्हणाले, "जर ते चान्सेलर झाले तर ते आशियाई वंशाचे पहिले व्यक्ती असतील. ही केवळ पाकिस्तानसाठीच नव्हे तर संपूर्ण आशिया आणि उर्वरित जगासाठी मोठी उपलब्धी असेल." इम्रान खान यांना गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये भ्रष्टाचारापासून हिंसाचार भडकावण्यापर्यंतच्या अनेक आरोपांमध्ये तुरुंगात टाकण्यात आले होते.



# प्रासंगिक

## बदलापूरकरांच्या एकजुटीला सलाम!


एखाद्या लहान मुलीवर अत्याचार झाल्यावर काय घडू शकते हे बदलापूरकरांनी काल महाराष्ट्राला आणि संपूर्ण देशाला दाखवून दिले. बदलापूर येथील आदर्श विद्यालयातील चार वर्षीय दोन चिमुकल्या मुलींवर एका नराधमाने लैंगिक अत्याचार केला. आणि बदलापूरात भडका उडाला. हा लैंगिक अत्याचार करणारा दुसरा तिसरा कोणी नसून त्याच शाळेत सेवेत असलेल्या अक्षय शिंदे या नराधमाने केला. अत्यंत चीड आणणारी हि दुर्दैवी घटना 13 आणि 14 ऑगस्ट रोजी घडली. एका पाठोपाठ एक अशा दोन चिमुकल्या मुली या नराधमाच्या वासनेच्या शिकार झाल्यात. पण शाळा सांचालक, मुख्याध्यापिका आणि वर्गशिक्षिका यांनी हि सारी घटना तिथेच दाबून टाकण्याचा प्रयत्न केला. आणि 15 ऑगस्ट रोजी स्वातंत्र्याचा झेंडाही फडकवीला. आपल्या शाळेत इतकी संतापजनक घटना घडूनही स्वातंत्र्याच्या झेंडाला वंदन करताना शाळा संचालक आणि मुख्याध्यापक यांच्या हाताला लकवा मारायला हवा होता पण तसे झाले नाही. पण नियतीने त्याचा बदला पाच दिवसांनी आज घेतला. संतप्त झालेल्या बदलापूरकरांनी प्रथम शाळेवर धडक दिली आणि शाळेत घुसून मिळेल त्या मार्गानी शाळेची तोडफोड करुन आपला संताप, आपली चीड व्यक्त केली. यात पालक आणि माजी विद्यार्थी यांचाही समावेश होता. माजी विध्यार्थी आणि पालकांना आपल्याच शाळेत घुसून संताप व्यक्त करण्याची वेळ का आली! याचा विचार बदलापूरच्या केवळ आदर्श विद्यालयाने करुन चालणार नाही तर राज्यातील सर्वच शाळा संचालक आणि मुख्याध्यापकांनी गांभीर्याने करायला हवा. हे गांभीर्य आदर्श शाळेच्या मुख्याध्यापिकानी दाखविले नाही म्हणूनच हि दुर्दैवी आणि संतापजनक घटना घडली असेच म्हणावे लागेल. कारण ज्या नराधमाने या चिमुकल्या मुलींवर लैंगिग अत्याचार केला त्याच नराधमाकडे या चिमुकल्या मुलींना वॉशरूम मध्ये घेऊन जाण्याची जबाबदारी होती अशी माहिती समोर आली आहे. हे सारे जर सत्य असेल तर या दुर्दैवी घटनेला मुख्याध्यापक किंवा त्या नराधमला हि जबाबदारी देणारी व्यक्ति तितकीच दोषी आहे. त्यामुळे तितकाच गंभीर गुन्हा त्या व्यक्तीवर दाखल होणे गरजेचे आहे. मुळात प्राथमिक शाळेत पुरुष असलेल्या व्यक्तीची नेमणूक केलीच जात नाही. किंबहुना शाळांच्या बसेस मध्येही सेविका म्हणून महिलेचीच नेमणूक केली जाते. शासनाची तशी सक्त ताकीत आहे. तरीही आदर्श विद्यालयाने या नराधमाची नेमणूक प्पूर्व प्राथमिक शाळेत कशी केली. आणि कोणत्या निकषावर केली हे बदलापूरकरांना समजायला हवे. जर नियम डावलून या नराधमांची नेमणूक संस्था चालकांनी केलीच नसती तर हि दुर्दैवी घटना घडलीच नसती आणि बदलापूरकरांनीही रेल्वे मार्गांवर ठिय्या देऊन संताप व्यक्त करावा लागला नसता. पण घडलेल्या दुर्दैवी घटनेबाबत बदलापूरकरांनी न्याय मागितला. यात बदलापूरकरांचे काहीच चुकलेले नाही. रेल्वे मार्गांवर येऊन न्याय मागणे हि दुर्दैवी घटनेनंतर घडलेली प्रतिक्रिया होती. तरीही शांततेच्या मार्गाने आंदोलन केलेल्या बदलापूरकरांच्या रौद्र रूपामुळे पोलीस यंत्रणेला आणि प्रशासनाला घाम सुटला. पण योग्य वेळी पोलीस यंत्रणेने कारवाई केली असती तर हि परिस्थिती उद्भवलीच नसती. पोलीस यंत्रणाबाबत आधीच सामान्यांचा विश्वास उडालेलाच आहे त्यामुळेच त्यांच्याकडून तात्काळ कारवाई होईल अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे. सामान्यांबाबत मर्दानगी दाखवित तात्काळ कारवाई करताना पोलीस यंत्रणा दिसते, मात्र इतरांच्या बाबतीत तितकी करताना दिसत नाहीत. पोलीस यंत्रणाची हिच मर्दानगी काल बदलापूरच्या रेल्वे स्थानकावर संपूर्ण महाराष्ट्राला पाहायला मिळाली. घडलेल्या दुर्दैवी घटनेबाबत न्याय मागणाऱ्या सामान्य बदलापूरकरांना बलदंड पोलिसांनी सरकारी दांडूक्यानी यथेच्छ चोपून विजय साजरा केला. यात अनेक महिलांच्या हातापायांना जबर दुखापत झाली. रेल्वे मार्गांवर, फलाटावर हजारो चपलांचा खच पडला. तरीही महिला जागच्या हलल्या नाहीत. पोलिसांच्या दांडूक्यांचा मार खात त्या न्याय मागत होत्या. मात्र त्यांना हुसकावून लावीय पोलिसांनी विजय साजरा केला. विजय साजरा करणाऱ्या पोलिसांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल पासून अंबरनाथ आणि पुणे पासून बदलापूर पर्यंत अडकलेल्या प्रवासांची प्रतिक्रिया ऐकली असती तर हा विजय नसून आपला पराभव आहे हे सुद्धा पोलिसांना समजून येईल. या मार्गात अडकलेल्या प्रवासाचे विशेषता महिला प्रवासाचे म्हणणे होते की कितीही रात्र होवो आम्ही त्रास सहन करणार! पण आंदोलन सुरूच राहायला हवे! त्या चिमुकल्या मुलींना न्याय मिळायला हवा!. आंदोलनाने वाटेत अडकलेल्या प्रवाशांचीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राची हिच प्रतिक्रिया होती आणि आहे. या साऱ्या दुर्दैवी घटनेबाबत बदलापूरकरांनी जो संयम दाखवून एकजुटीची ताकत दाखविली त्याबद्दल बदलापूरकरांना खरोखरच सलाम करायलाच हवा. स्थानिक नेते असो, मंत्री गिरीश महाजन असो किंवा वरिष्ठ दर्जाचे पोलीस अधिकारी असो बदलापूरकरांनी कोणालाच भीक घातली नाही. अत्याचार झालेल्या चिमुकल्या मुलीच्या न्यायासाठी ऊन पावसात दहा तास पाय घट्ट रोवून उभे राहिले. सामान्यांची ताकत काय आहे हे बदलापूरकरांनी देशाला दाखवून दिले. पोलिसांनी दांडूक्याच्या ताकतीने काही काळासाठी हे आंदोलन चिरडले असले तरी या आंदोलनातील सामान्यांच्या मानातील चीड, संताप पाहता देशाची वाटचाल अराजकतेच्या दिशेने चालली तर नाही ना! अशी शंका सामान्यांच्या मनात निर्माण होऊ लागली आहे. बदलापूरकरांच्या एकजुटीने महाराष्ट्रातील सामान्यांना दिशा दिली. म्हणूनच बदलापूरकरांच्या एकजुटीला सलाम!

**- सुरेंद्र मुळीक**

# राज्यसभा-विधानपरिषदेत एससी-एसटी आरक्षण शक्य

## भाजपची तयारी, केरळात होणाऱ्या संघाच्या बैठकीत होऊ शकतो निर्णय

वृत्तसंस्था
नवी दिल्ली



जात जनगणना आणि आरक्षणाच्या मुद्द्यावर विरोधकांच्या आक्रमक भूमिकेला तोंड देण्यासाठी, भाजप राज्यसभा आणि राज्यांच्या विधानपरिषदांमध्ये एससी/एसटी वर्गाला आरक्षण देण्याचे आश्वासन देऊ शकते. 31 ऑगस्ट ते 2 सप्टेंबर या कालावधीत केरळमध्ये आरएसएससोबत होणाऱ्या समन्वय बैठकीत या विषयावर अंतिम निर्णय घेतला जाऊ शकतो.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी दिल्लीत झालेल्या भाजप पदाधिकाऱ्यांच्या बैठकीतही यावर चर्चा झाली. या बैठकीत सर्व प्रदेशाध्यक्षांचाही सहभाग होता. पक्षाच्या भविष्यातील रणनीतीबाबत बैठकीत चर्चा झालेल्या मुद्द्यांमध्ये आरक्षणाचाही समावेश होता.

लोकसभा निवडणुकीच्या चर्चेदरम्यान 'आरक्षण रद्द करणार', 'संविधान बदलणार' अशा विरोधकांच्या कथनाने नुकसान झाल्याचे समोर आले. या मुद्द्यावर एससी-एससी समुदायामध्ये अजूनही साशंकता आहे, ज्याला विरोधक विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी पंख लावू शकतात. भाजप यावर उपाय शोधत आहे.

आता विधानसभा आणि लोकसभेच्या पलीकडे आरक्षण देण्याचे आश्वासन देऊन पक्ष विरोधकांच्या कथनाचा मुकाबला करू शकतो. सध्या यूपी, बिहार, महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशमध्ये विधान परिषद आहेत. विधान परिषदांमध्ये एससी-एसटीला 5 टक्के आरक्षण देण्याचा भाजपचा विचार आहे. लोकसभा आणि विधानसभांमध्ये एससी-एसटी प्रवर्गासाठी आरक्षण आहे. घटनेच्या कलम 332 नुसार, SC-ST समुदायासाठी विधानसभेत त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा राखीव आहेत. त्याच वेळी, लोकसभेत SC-ST साठी 131 जागा राखीव आहेत. 84 SC आणि 47 ST जागा आहेत.

# वरिष्ठ अधिकाऱ्यांची थेट भरती अखेर UPSC कडून रद्द

## विरोधकांच्या दबावानंतर केंद्र सरकारचे घुमजाव




वृत्तसंस्था
नवी दिल्ली

केंद्र सरकारमध्ये सहसचिव, संचालक आणि उपसचिव या पदांवर लवकरच परीक्षा न घेता विविध क्षेत्रातील तज्ज्ञांची भरती करण्यासाठी केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) जाहिरात काढली होती. ४५ जागांसाठी ही भरती होणार होती. या जाहिरातीवर विरोधकांनी जोरदार टीका केली. देशभरातून केंद्र सरकारच्या निर्णयावर टीका झाल्यानंतर अखेर मंगळवारी (दि. २० ऑगस्ट) केंद्र सरकारच्या आदेशानंतर यूपीएससीने ही जाहिरात रद्द करत असल्याचे सांगितले.

केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी यूपीएससीच्या अध्यक्ष प्रिती सुदान यांना पत्र लिहिले असून त्यात ते म्हणाले, "सरकारी सेवेत उपेक्षित आणि वंचित घटकांतील समूहांना बरोबरीचे प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. जेणेकरून संविधानांतील सामाजिक न्यायाचे तत्व अबाधित राहिल."

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी एक्सवर प्रतिक्रिया देताना म्हटले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेहमीच सामाजिक न्यायाचे तत्व जोपासले आहे. त्यांनी समाजातील वंचित घटकांसाठी नेहमीच कल्याणकारी योजना आणण्याचा प्रयत्न केला. थेट भरती करण्याचा निर्णय हा सामाजिक न्यायाच्या तत्त्वाला धरूनच होता.

१७ ऑगस्ट रोजी यूपीएससीने सदर जाहिरात प्रसिद्ध केली होती. ज्यामध्ये म्हटले होते की, बुद्धिवंत आणि स्फुर्तीदायी उमेदवारांना आम्ही थेट भरतीसाठी आवाहन करत आहोत. केंद्र सरकारच्या मंत्रालयांमध्ये सहसचिव, संचालक आणि उपसचिव पदांसाठी जाहिरात आणली गेली होती. मात्र जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर विरोधकांसह सत्ताधारी एनडीएमधील घटक पक्षांनीही विरोध केला होता. जनता दल (संयुक्त) आणि लोक जनशक्ती पक्षाने या निर्णयाचा विरोध केला होता.

राहुल गांधी यांनी एक्सवर पोस्ट करून या निर्णयाचा विरोध केला. ते म्हणाले, "केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयातील उच्च पदावर बाहेरून उमेदवार निवडून मोदी सरकार एकप्रकारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसींचा हक्क हिसकावून घेत आहे. त्यांच्या आरक्षणाला यामुळे नख लागत आहे. मी हे वारंवार सांगत आलो आहे की, सरकारमधील महत्त्वाच्या पदावर उपेक्षित घटकांतील अधिकारी नियुक्त केलेले नाहीत. यात सुधार करायचा सोडून केंद्र सरकार आता खुलेआम बाहेरून उमेदवार आयात करून उच्च पदावर त्यांना बसविणार आहे.

# अजमेर सेक्स स्कँडलच्या 6 दोषींना जन्मठेप

## 32 वर्षांपूर्वी 100 विद्यार्थिनींवर केला होता गँगरेप

वृत्तसंस्था
अजमेर



अजमेर सेक्स स्कँडलमधील आरोपींना मंगळवारी कडेकोट बंदोबस्तात न्यायालयात हजर करण्यात आले. अजमेरमध्ये 32 वर्षांपूर्वी घडलेल्या देशातील सर्वात मोठ्या सेक्स स्कँडलमधील 6 दोषींना जिल्हा न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. यासोबतच त्यांना 5 लाखांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.

न्यायालयाने नफीस चिश्ती, नसीम ऊर्फ टारझन, सलीम चिश्ती, इक्बाल भाटी, सोहिल गनी, सय्यद जमीर हुसेन यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

शिक्षा सुनावण्यात आली त्यावेळी सहा आरोपी न्यायालयात हजर होते. आरोपींपैकी इक्बाल भाटी याला दिल्लीहून रुग्णवाहिकेतून अजमेरला आणण्यात आले. उर्वरित आरोपी आधीच न्यायालयात होते. या सहा आरोपींविरुद्ध 23 जून 2001 रोजी आरोपपत्र सादर करण्यात आले. याचवर्षी जुलैमध्ये सुनावणी पूर्ण झाली.

1992 मध्ये 100 हून अधिक महाविद्यालयीन मुलींवर सामूहिक बलात्कार करून त्यांचे नग्न फोटो प्रसारित करण्यात आल्याने खळबळ उडाली होती. या प्रकरणात 18 आरोपी होते. 4 जणांना शिक्षा झाली आहे. यातील 4 जणांची उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. या खटल्यातच 30 वर्षांपूर्वी एकाने आत्महत्या केली होती. दोन आरोपींविरुद्ध मुलाच्या विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यापैकी एकाला शिक्षा झाली असून दुसऱ्याविरुद्ध खटला सुरू आहे. एक आरोपी फरार असून 6 जणांचा निकाल आज आला आहे.

ही घटना 1992 सालची आहे. या गुन्ह्याचे सूत्रधार, अजमेर युवक काँग्रेसचे अध्यक्ष (तत्कालीन) फारुख चिश्ती, नफीस चिश्ती (तत्कालीन युवक काँग्रेसचे सहसचिव) आणि अन्वर चिश्ती (तत्कालीन युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष) आणि इतर आरोपींनी एका व्यावसायिकाच्या मुलाशी मैत्री केली होती. त्याच्यासह बलात्कार करून फोटो काढले. त्याला ब्लॅकमेल केल्यानंतर त्यांनी त्याच्या मैत्रिणीला पोल्ट्री फार्ममध्ये आणून तिच्यावर बलात्कार केला. रील कॅमेऱ्याने तिचे नग्न फोटो काढले. तिलाही तिच्या मैत्रिणींना त्यांच्याकडे आणण्यास भाग पाडले. यानंतर त्याने एकामागून एक अनेक मुलींवर बलात्कार केला आणि नग्न छायाचित्रे काढली. यानंतर त्यांनी लोकांना वेगवेगळ्या ठिकाणी बोलावून ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली.

आरोपींनी फोटो डेव्हलप करण्यासाठी रील दिली होती. नग्न छायाचित्रे पाहून लॅबमधील कर्मचाऱ्यांच्या मनात काळे आले. फोटो लॅबमधूनच मुलींचे न्यूड फोटो बाजारात आले. मोजक्याच लोकांकडे मास्टर प्रिंट होत्या, पण त्यांच्या झेरॉक्स प्रती शहरात पसरू लागल्या. यामुळे 6 महाविद्यालयीन तरुणींनी आत्महत्या केल्या होत्या.

## तब्बल 2 डझन गेमिंग ॲपवर ईडीचे लक्ष

नवी दिल्ली

काही दिवसांपूर्वी अवैधरीत्या ऑनलाइन गेमिंग ॲप चालवत त्याद्वारे हजारो कोटी रुपयांची उलाढाल करणाऱ्या महादेव ॲपचा पर्दाफाश करण्यात आला. यावेळी अनेक कलाकारांना याचा फटका बसला. त्यानंतर आता अशा पद्धतीच्या अवैधरीत्या चालवण्यात येणाऱ्या गेमिंग ॲपवर ईडीची नजर असणार आहे. सध्या ईडीचे लक्ष 2 डझन गेमिंग ॲपवर असून यामधून तब्बल 11 लाख कोटींहून अधिक रुपयांची उलाढाल झाल्याचा संशय ईडीला आहे. देशभरातली लाखो लोकांना महादेव या गेमिंग ॲपचा फटका बसला. या ॲपच्या मालकांनी हवाला आणि इतर मार्गांनी हा पैसा दुबईमध्ये वळवल्याचे आढळले. त्यानंतर याच पार्श्वभूमीवर अनेक परदेशी ॲप चालवली जात असल्याचा संशय असल्याने ईडी सध्या अलर्ट मोडवर आहेत.

# बलात्कार पीडितेवर हायकोर्टाची टिप्पणी सुप्रीम कोर्टात फेटाळली

## बलात्काराच्या आरोपीची शिक्षा पूर्ववत

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (20 ऑगस्ट) अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या आरोपीची शिक्षा बहाल केली. तसेच किशोरवयीन मुलींनी त्यांच्या लैंगिक इच्छांवर नियंत्रण ठेवावे, अशी कोलकाता उच्च न्यायालयाची टिप्पणीही नाकारली. दोन मिनिटांच्या आनंदासाठी त्या समाजाच्या नजरेत पडतात.

सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती अभय एस ओका आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने सांगितले- आम्ही कनिष्ठ न्यायालयांनी निर्णय कसा लिहावा यासंदर्भातही सूचना जारी करत आहोत. सर्वोच्च न्यायालयाने हायकोर्टाच्या टिप्पणीला आक्षेपार्ह ठरवले होते.

कोलकाता उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती चित्तरंजन दास आणि न्यायमूर्ती पार्थ सारथी सेन यांच्या खंडपीठाने 18 ऑक्टोबर 2023 रोजी बलात्कार प्रकरणाची सुनावणी केली. खंडपीठाने या मुलाला त्याच्या अल्पवयीन मैत्रिणीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी निर्दोष ठरवले होते. दोन किशोरवयीन मुलांचे प्रेमसंबंध होते आणि त्यांनी संमतीने लैंगिक संबंध ठेवले. जिल्हा न्यायालयाने या मुलाला पॉक्सो कायद्यांतर्गत दोषी ठरवून 20 वर्षांची शिक्षा सुनावली होती. या निर्णयाविरोधात त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

# पाक संसदेत उंदरांचा हैदोस, शिकारी मांजरांची खरेदी

## 12 लाखांचे बजेट पास

वृत्तसंस्था
इस्लामाबाद

पाकिस्तानातील आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर सरकारने देशाच्या संसदेत उंदरांचा सामना करण्यासाठी शिकारी मांजरी तैनात करण्याचा निर्णय घेतला आहे. पाकिस्तानच्या कॅपिटल डेव्हलपमेंट अथॉरिटीने (सीडीए) यासाठी 12 लाख पाकिस्तानी रुपयांचे बजेट दिले आहे.


पाकिस्तानी वाहिनी जिओ टीव्हीने सोमवारी ही माहिती दिली. वास्तविक संसदेतील उंदरांची संख्या सातत्याने वाढत आहे. त्यांनी सिनेट आणि नॅशनल असेंब्लीच्या विभागांमधील अनेक महत्त्वाच्या आणि गोपनीय फायली कुरतडल्या आणि नष्ट केल्या. तारा कापून ते संगणकाचे नुकसान करत आहेत.

या उंदरांचा नायनाट करण्यासाठी खासगी तज्ज्ञांची मदत घेण्याचाही सीडीएचा विचार आहे. याशिवाय उंदीर पकडण्यासाठी विशेष प्रकारचे जाळीचे सापळे (माऊस ट्रॅप) ही बसविण्यात येणार आहेत.

पाकिस्तानातील आर्थिक संकट संपण्याची चिन्हे दिसत नाहीत. देशाने आतापर्यंत IMF कडून $6.28 अब्ज कर्ज घेतले आहे. दरम्यान, पाकिस्तानमध्ये गाढवांची संख्या सातत्याने वाढत आहे. पाकिस्तान सरकारने दोन महिन्यांपूर्वी देशाचा आर्थिक सर्वेक्षण सादर केला होता, ज्यामध्ये एका वर्षात देशातील गाढवांची संख्या 1.72 टक्क्यांनी वाढून 59 लाखांवर पोहोचल्याचे सांगण्यात आले होते. गाढव पालनाच्या बाबतीत पाकिस्तानचा तिसरा क्रमांक लागतो. 2022 मध्ये पाकिस्तानात गाढवांची लोकसंख्या 58 लाख होती. पाकिस्तान दरवर्षी चीनला सरासरी 5 लाख गाढवांची निर्यात करतो, तरीही देशातील गाढवांची संख्या 1 लाखांनी वाढली आहे. पाकिस्तान सरकारने गेल्या वर्षी म्हटले होते की, आता गाढवांच्या विक्रीतून परकीय गंगाजळी मिळेल.

# मी कोणाला भेटलो नाही!

वृत्तसंस्था
कोलकाता



झारखंडचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन आज दिल्लीहून थेट कोलकाता येथे जाणार आहेत. सायंकाळी 7 वाजता ते कोलकात्यात पोहोचतील. मंगळवारी दिल्ली विमानतळावर पत्रकारांशी संवाद साधताना ते म्हणाले, 'मी कोणालाही भेटलो नाही. मी येथे (दिल्ली) काही वैयक्तिक कामासाठी आलो आहे. मला त्यांना (भाजप नेते) भेटायचे नव्हते.

भाजपमध्ये प्रवेश करण्याच्या शक्यतेवर ते म्हणाले, 'हे सर्व कोण म्हणतंय हे मला समजत नाहीये?'

रांची येथील सीएम हाऊसमध्ये गोंधळ वाढला आहे. येथे आमदार येण्यास सुरुवात झाली आहे. मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्यानंतर समीर मोहंती आणि रामदास सोरेन म्हणाले की, आम्ही झामुमोमध्ये होतो आणि भविष्यातही राहू. इथून कुठेही जात नाही. हेमंत सोरेन आणि शिबू सोरेन यांचे हात बळकट करू.

रविवारी दुपारी एकच्या सुमारास चंपाई दिल्लीत पोहोचले. शुक्रवारपासून ते भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे. रविवारी दिल्लीत पोहोचल्यावर भाजपमध्ये प्रवेश करण्याच्या प्रश्नावर त्यांनी 'मी जिथे आहे तिथेच राहीन' असे स्पष्टपणे सांगितले.

# ट्रम्प जिंकल्यास मस्क यांना सल्लागार बनवतील

## मी सेवा करण्यास तयार - मस्क

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन



अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, ते टेस्लाचे प्रमुख एलॉन मस्क यांना सल्लागार बनवण्यास तयार आहेत. या वर्षी नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या अमेरिकन राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत ट्रम्प हे रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार आहेत.

रॉयटर्स या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ट्रम्प यांना विचारण्यात आले की, मस्क निवडणूक जिंकल्यास त्यांना सल्लागार किंवा कॅबिनेट पद देणार का? यावर ट्रम्प यांनी 'हो' असे उत्तर दिले. ट्रम्प म्हणाले की, मस्क खूप हुशार आहेत. त्यांना हवे असल्यास ते केले जाईल.

ट्रम्प यांच्या या मुलाखतीनंतर मस्क यांची प्रतिक्रियाही आली आहे. मी सेवा करण्यास तयार असल्याचे त्यांनी सोशल मीडियावर लिहिले आहे. त्यांनी पोस्टमध्ये AI चित्रही टाकले आहे. यामध्ये ते सरकारी कार्यक्षमता विभाग (DOGE) या शब्दांसह व्यासपीठासमोर उभा असल्याचे दाखवले आहे. यामध्ये DOGE हे लहान स्वरूपात लिहिले आहे.

DOGE हा लोकप्रिय क्रिप्टोकरन्सी Dogecoin चा शॉर्टफॉर्म देखील आहे. ही एक क्रिप्टोकरन्सी आहे. मस्क अनेक दिवसांपासून सोशल मीडियावर त्याची जाहिरात करत आहे. 2013 मध्ये सॉफ्टवेअर अभियंते बिली मार्कस आणि जॅक्सन पामर यांनी डॉजकॉइनची सुरुवात विनोद म्हणून केली होती. हे एका मीमवर आधारित आहे.

तीन महिन्यांपूर्वी अमेरिकन वेबसाइट वॉल स्ट्रीट जर्नलने दावा केला होता की, अध्यक्षपदाची निवडणूक जिंकल्यानंतर ट्रम्प सरकारमधील महत्त्वाच्या जबाबदाऱ्या मस्क यांच्याकडे सोपवू शकतात. अहवालातील सूत्रांच्या हवाल्याने असे म्हटले आहे की, राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर ट्रम्प मस्क यांना आपले धोरण सल्लागार बनवू शकतात.

# बांगलादेशच्या माजी पंतप्रधान झिया यांचे बँक खाते अनफ्रीज होणार

## 17 वर्षे होते ब्लॉक

वृत्तसंस्था
ढाका



बांगलादेशमध्ये विरोधी पक्षनेत्या आणि माजी पंतप्रधान खालिदा झिया यांच्या बँक खात्यावरील बंदी उठवण्यात आली आहे. नॅशनल बोर्ड ऑफ रेव्हेन्यू (NBR) ने सोमवारी (19 ऑगस्ट) झिया यांची बँक खाती अनफ्रीझ करण्याचा निर्णय घेतला. त्यांची बँक खाती 17 वर्षांपासून गोठवण्यात आली आहेत. हे खाते कधी गोठवले जाईल याची माहिती नाही.

NBRच्या सेंट्रल इंटेलिजन्स सेलने ऑगस्ट 2007 मध्ये खालिदा झिया यांची खाती गोठवण्याचे आदेश दिले होते. तेव्हापासून त्यांची खाती ब्लॉक करण्यात आली आहेत. बीएनपीने अनेकवेळा त्यांची खाती उघडण्याची मागणी केली आहे. शेख हसीना सत्तेबाहेर झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

बंगाली वृत्तपत्र डेली स्टारच्या म्हणण्यानुसार, एनबीआरने म्हटले आहे की खालिदा झिया यांच्या विरोधात कोणताही तपास खटला नाही, त्यामुळे बँकांना त्यांची सर्व खाती अनफ्रीझ करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यापूर्वी हसीना यांनी 5 ऑगस्ट रोजी देश सोडल्यानंतर खालिदा यांची तुरुंगातून सुटका झाली होती. 2018 मध्ये भ्रष्टाचाराच्या एका प्रकरणात त्याला 17 वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली होती.

शेख हसीना यांच्या अडचणी वाढत आहेत. बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरण (ICT) येथे सोमवारी माजी पंतप्रधान शेख हसीना आणि त्यांच्या 26 मंत्र्यांविरुद्ध नरसंहार आणि मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांची तक्रार दाखल करण्यात आली. मोहम्मद अबुल हसन असे तक्रारदाराचे नाव आहे. अबुल हसन यांचा मुलगा शहरयार हसन अल्वी हा विद्यार्थ्यांच्या आंदोलनात मारला गेला. यापूर्वी गेल्या आठवड्यात बुलबुल कबीर नावाच्या व्यक्तीनेही हसिनाविरोधात तक्रार दाखल केली होती.